# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990







## माजी मंत्री, आ. अमित देशमुख यांच्याकडून कव्हा व चांडेश्वर येथील अतिवृष्टीग्रस्त शेतीची पाहणी; तात्काळ पंचनाम्याचे निर्देश



लातूर/ प्रतिनिधी :-महिनाभरापासून लातूर जिल्ह्यात सुरू असलेल्या सततच्या पावसामुळे शेतीपिकांचे मोठे नुकसान झाले आहे. या नुकसानीची पाहणी करण्यासाठी राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री तथा लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांनी आज, सोमवार, २९ सप्टेंबर २५ रोजी सकाळी लातूर शहर मतदारसंघातील कव्हा व चांडेश्वर गावास भेट दिली. शेतकऱ्यांशी संवाद आणि नुकसानीची पाहणी: कन्हेरी महसूल मंडळ अंतर्गत येणाऱ्या कव्हा आणि चांडेश्वर गावात सोयाबीन, तूर आणि ऊस यासह अन्य पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. आमदार अमित देशमुख यांनी कव्हा येथील शेतकरी पांडुरंग देशमुख व अंबादास देशमुख यांच्या शेतात जाऊन सोयाबीन आणि तूर पिकाची पाहणी केली. तसेच, त्यांनी चांडेश्वर येथील शेतकरी साहेबराव सपाटे यांच्या शेतातील पिकांची पाहणी केली आणि संबंधित अधिकाऱ्यांना तात्काळ शेतकऱ्यांना मदत करण्याच्या सूचना केल्या. तात्काळ उपाययोजनांचे निर्देश: या पाहणीदरम्यान आमदार अमित देशमुख यांनी लातूर शहरानजीकच्या कातपूर तलावाची देखील पाहणी केली. तलावाचे पाणी रस्त्यावर येत असल्याने नागरिकांची गैरसोय होत असून, या संदर्भात तातडीने आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशा सूचना त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. तसेच त्यांनी प्रभाग क्र. १८ मधील शांतेश्वर नगर येथील रस्त्याची पाहणी करून, त्याचे काम तात्काळ सुरू करण्यास महापालिकेच्या अधिकाऱ्यांना सांगितले. यावेळी लातूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती सुनिल पडिले, लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष किरण जाधव, ट्वेंटीवन शुगरचे व्हा.चेअरमन विजय देशमुख, प्रा.गोविंद घार, नायब तहसीलदार- सतीश कांबळे, उपकृषी अधिकारी-ओमप्रकाश चिंताले, पंचायत समितीचे विस्तार अधिकारी-श्री.नल्ले, ग्रामपंचायत अधिकारी- सचिन कसबे,मंडळ कृषी अधिकारी आर.आर.येवले, कृषी सहाय्यक सचिन पडंगे, जिल्हा परिषद शाखा अभियंता के. एन. खरोळकर, सुदाम रूकमे, सुंदर पाटील कव्हेकर, उपसरपंच-किशोर घार, सिकंदर पटेल, गोविंद सोंदले, राम स्वामी, चंद्रकांत नलावडे, राजाभाऊ मोरे, जयहिंद पूरी, सुबुद्दीन शेख, महेश नलवडे जीवन गुंजरगे,डॉ.सतीश कानडे,रमेश थोरमोठे पाटील आदिसह काँग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी, कार्यकर्ते,कव्हा व चांडेश्वरचे ग्रामस्थ, शेतकरी उपस्थित होते.

## नैसर्गिक संकटात राज्यशासन शेतकऱ्यासह जनतेच्या पाठीशी- आ. रमेशआप्पा कराड

लातूर : - लातूर तालुक्यातील पूर्व भागातील विविध गावांना भेटी देवून भाजपाचे नेते आमदार श्री रमेशआप्पा कराड यांनी सततचा मुसळधार पाऊस, अतिवृष्टीमुळे आणि नद्यांना आलेल्या पुरामुळे नुकसान झालेल्या शेतीची त्याचबरोबर विविध ठिकाणच्या लोकवस्तीची पाहणी केली. शेतकरी, ग्रामस्थ यांच्याशी संवाद साधून त्यांच्याशी चर्चा करून व्यथा जाणून घेतल्या. राज्यातील महायुतीचे शासन आपल्या पाठीशी आहे नुकसान ग्रस्तांना निश्चितपणे मदत केली जाईल असा धीर आ. कराड यांनी दिला.

लातूर ग्रामीण मतदार संघातच नव्हे तर सबंध जिल्हाभरात प्रचंड अतिवृष्टी झाली, अनेक ठिकाणी ढगफुटी सारखा पाऊस झाला. यामुळे नदी नाल्या ओसांडून वाहत आहेत. मुसळधार पावसाने आणि सततच्या अतिवृष्टीमुळे खरिपाची हाताशी आलेली सोयाबीन, तूर, मूग, ऊस या पिकासह अनेकांच्या फळबागा पाण्यात गेल्या. शेतात जिकडे बघावे तिकडे पाणीच पाणी अशी परिस्थिती निर्माण झाली. तर मांजरा, रेणा नदीसह छोटे नाले, ओढे यांना प्रचंड पूर येऊन नदीनाल्याकाटच्या आणि सखल भागातील शेतीचे प्रचंड नुकसान झाले. अनेक ठिकाणच्या शेत जमिनी खरडून गेल्या. काही वस्त्यातील घरात पाणी शिरून मोठे नुकसान झाले या सर्व लातूर तालुक्याच्या पूर्व भागातील नुकसानीची पाहणी लातूर ग्रामीणचे आमदार श्री रमेशआप्पा कराड यांनी रविवारी केली.



या दौऱ्यात लातूर तालुक्यातील मौजे खुलगापूर, कासारखेडा, कोळपा, भातखेडा, ममदापूर, बोरी, मुशिराबाद, सलगरा आणि उमरगा या गावांना भेटी देऊन लातूर ग्रामीणचे आमदार श्री रमेशआप्पा कराड यांनी मांजरा नदीकाठच्या शेतीची आणि पावसाने नुकसानग्रस्त झालेल्या शेतीची, पाणी शिरलेल्या घरांची आणि ओढे नाल्यावरील नुकसान झालेल्या लहान मोठ्या पुलांची आणि रस्त्याची त्याचबरोबर मौजे खुलगापूर येथील पाण्याने वेढलेल्या जिल्हा परिषद शाळेची पाहणी केली. प्रत्येक ठिकाणी शेतकऱ्यासह नागरिकांनी दिलेल्या निवेदनाचा स्वीकार केला. या पाहणी दौऱ्यात लातूरचे तहसीलदार सौदागर तांदळे, गटविकास अधिकारी श्याम गोडभरले, तालुका कृषी अधिकारी येवले, जि.प. बांधकाम विभागाचे कुलकर्णी, भाजपा किसान मोर्चाचे विक्रमकाका शिंदे, भागवत सोट, नवनाथ भोसले, सतीश आंबेकर, पांडुरंग बालवाड, विजय मलवाडे, मंडल अध्यक्ष प्रताप पाटील, शरद दरेकर, उद्धव काळे, महादेव साळुंके, पद्माकर चिंचोलकर, मारुती शिंदे, संजय सावंत, रवींद्र पाटील, शेख अहमद यांच्यासह संबंधित विभागाचे अधिकारी, मंडल अधिकारी, ग्रामसेवक, तलाठी, कृषी सहाय्यक व इतर अनेक जण होते.

पाहणी दौऱ्याच्या निमित्ताने ठिकठिकाणी शेतकरी आणि नागरिकांशी संवाद साधताना भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, या अतिवृष्टीमुळं शेतकऱ्याच्या हाता-तोंडाशी आलेला घास निसर्गानं हिरावला आहे. शेतकरी अन् सर्वसामान्य नागरिकही संकटाच्या कचाट्यात सापडले आहेत. राज्यातील महायुतीचे सरकार आपल्या पाठीशी असून झालेल्या नुकसानपोटी सर्व शेतकर्यांना सरसकट आर्थिक मदत देण्यात येणार आहे. नदी नालेकाठच्या खरडून गेलेल्या जमिनीचे पंचनामे करण्यात येणार असून शासनाच्या मदतीपासून कोणीही वंचित राहू नये यासाठी संबंधित कर्मचाऱ्यांनी काळजी घ्यावी अशा सूचना त्यांनी दिल्या.

आ. कराड यांच्या पाहणी दौऱ्याप्रसंगी त्या त्या गावातील आदिनाथ मुळे, लक्ष्मण नागिमे, सोमनाथ वाघमारे, लक्ष्मण मुळे, रुपेश काळे, लिंबराज बोळंगे, हनुमंत गव्हाणे, रुपेश थोरमोठे, पुंडलिक बेंबडे, नेताजी रणखांब, बालाजी जाधव, साहेबराव नवल, सतीश बिराजदार, सुरेश पाटील, अशोक बिराजदार, धनराज शिंदे, सरपंच कमलबाई शिंदे, दत्तात्रय गडदे, नंदकुमार थोरात, चंद्रकांत पासमे, पद्माकर शिंदे, ज्ञानोबा शेळके, दिलीप शिंगडे, राजेंद्र बनसोडे, पद्माकर गव्हाणे, गोवर्धन स्वामी आदी प्रमुख कार्यकर्त्यांसह शेतकरी नागरिक ग्रामस्थ मोठ्या संख्येने होते.

## संकटग्रस्तांना आधार देण्याकरीता आ. कराड लातूर तालुक्यातील शेतकऱ्यांच्या बांधावर

लातूर : - सततचा मुसळधार पाऊस, अतिवृष्टीमुळे लातूर ग्रामीण मतदार संघातील अनेक गावांना मोठा फटका बसला असून शेतीचे प्रचंड नुकसान झाले आहे. या नुकसानीमुळे हवालदील झालेल्या शेतकऱ्यांना आधार देण्यासाठी लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांनी लातूर तालुक्यातील अनेक नुकसानग्रस्त गावांचा दौरा करून नुकसानीची पाहणी केली राज्यातील महायुतीचे शासन शेतकऱ्यासह जनतेच्या पाठीशी खंबीरपणे असल्याचे त्यांनी बोलून दाखवले.



लातूर ग्रामीण मतदार संघात सर्वत्र प्रचंड अतिवृष्टी आणि मुसळधार पाऊस झाला. नदी नाल्याना पुर आले. मुसळधार पावसाने आणि सततच्या अतिवृष्टीमुळे खरिपाची हाताशी आलेली सोयाबीन, ऊसासह फळबागाचे प्रचंड नुकसान झाले. शेतात जिकडे, तिकडे पाणीच पाणी झाले. तर मांजरा नदीसह लहान मोठ्या सर्वच नाले, ओढे यांना पूर येऊन शेत जमिनी खरडून गेल्या. शेतकऱ्याचे प्रचंड नुकसान झाले. अनेकांच्या घराची पडझड झाली लातूर तालुक्यातील मौजे नागझरी, जेवळी, टाकळी, काडगाव, काडगाव तांडा, गाधवड, तांदूळजा, कानडी बोरगाव, निळकंठ, भोसा, मसला, भिसे वाघोली, माटेफळ, करकट्टा या गावातील नुकसानीची पाहणी लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांनी सोमवारी केली. शेतकरी, ग्रामस्थ यांच्याशी संवाद साधून त्यांच्याशी चर्चा करून अडीअडचणी आणि व्यथा जाणून घेतल्या. राज्यातील महायुतीचे शासन आपल्या पाठीशी आहे नुकसान ग्रस्तांना निश्चितपणे मदत केली जाईल. नदी नालेकाठच्या खरडून गेलेल्या जमिनीचे पंचनामे करण्यात येणार असून शासनाच्या मदतीपासून कोणीही वंचित राहू नये यासाठी संबंधित कर्मचाऱ्यांनी काळजी घ्यावी अशा सूचना त्यांनी दिल्या.

या दौऱ्यात लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांनी पावसाने आणि पुराने नुकसानीत आलेल्या शेतीची, लहान, मोठ्या पुलाची पाहणी केली. प्रत्येक ठिकाणी शेतकऱ्यासह नागरिकांनी दिलेल्या निवेदनाचा स्वीकार केला. त्यांच्यासमवेत संवाद साधून अडीअडचणी जाणून घेतल्या. ठिकठिकाणी बोलताना राज्यातील महायुती शासन आपल्या पाठीशी आहे असे सांगून कानडी बोरगाव बॅरेजचे दरवाजे नादुरुस्त असल्याने दरवाजे उघडत नसल्यामुळे बेरीजचे पाणी शेतात जाऊन प्रचंड नुकसान झाले याची दखल घेऊन तात्काळ दरवाजे उघडून दुरुस्त करावेत अशा सूचना पाटबंधारे यांत्रिकी विभागाच्या अधिकाऱ्यांना दिल्या.

भिसेवाघोली येथे रस्त्यालगत खचलेल्या विहिरमुळे बस सेवा बंद झाली असून त्या ठिकाणी तात्काळ संरक्षण भिंत बांधण्याची संबंधितांना सूचना केली. निळकंठ गावालगतच्या ओढ्यावरील पुलाची तात्पुरती दुरुस्ती करून नाबार्ड योजनेतून नवीन पूल बांधण्याचा प्रस्ताव दाखल करावा त्याचबरोबर कळंब - लातूर मेन रोडवरील काडगाव येथील चौकात सातत्याने पाणी साचत असल्याने रस्त्याची उंची वाढवण्याची सूचना आ. रमेशआप्पा कराड यांनी केली.

या पाहणी दौऱ्यात भाजपा किसान मोर्चाचे विक्रमकाका शिंदे, भागवत सोट, नवनाथ भोसले, भाजपा मंडल अध्यक्ष सुरज शिंदे, प्रताप पाटील, सतीश आंबेकर, हनुमंतबापू नागटिळक, बन्सी भिसे, वैभव सापसोड, शाम वाघमारे, भैरवनाथ पिसाळ, संभाजी वायाळ, गोपाळ पाटील, अशोक सावंत, सचिन लटपटे, योगीराज साखरे, अशोक गंगणे, प्रशांत शिंदे, महेश कणसे, लता भोसले, बाबासाहेब भिसे, अहमद शेख, शंकर चव्हाण, अमोल लोमटे, विकास लोंढे, शुभम खोसे त्याचबरोबर नायब तहसीलदार सरवदे, सहा.गटविकास अधिकारी चोरमले, जि.प. बांधकाम विभागाचे कुलकर्णी, बांधकाम विभागाचे बिराजदार, मराविमचे शेंडेकर यांच्यासह संबंधित विभागाचे अधिकारी, कर्मचारी, मंडल अधिकारी, ग्रामसेवक, तलाठी, कृषी सहाय्यक व भाजपाचे कार्यकर्ते त्या त्या गावातील शेतकरी नागरिक व इतर अनेकजण होते.

## दोन समाजामध्ये व्देषभाव निर्माण करण्याचे उद्देशाने फेसबुकवरुन व्हिडीओ व्हायरल करण्याऱ्याविरुद्ध गुन्हा नोंद.

लातूर :- दोन समाजामध्ये व्देषभाव निर्माण करण्याचे उद्देशाने फेसबुकवरुन व्हिडीओ व्हायरल करण्याऱ्याविरुद्ध गुन्हा नोंद.*

लातुर शहरामध्ये दिनांक २४/०९/२०२५ रोजी कानपुर उत्तरप्रदेश येथील घटनेसंदर्भात लातुर शहरात काढण्यात आलेल्या निषेध मोर्चावरुन हिंदु व मुस्लीम समाजामध्ये व्देषभाव निर्माण करण्याचे उद्देशाने फेसबुक सोशल मिडीयाद्वारे अफवा पसविणारा खोटा व्हिडीओ व्हायरल केल्याप्रकरणी पो.स्टे. विवेकांनद चौक लातुर येथे गुन्हा दाखल करण्यात आलेला असून पुढील तपास चालु आहे.

अशाप्रकारे सोशल मीडियावर पोस्ट किंवा व्हिडिओ प्रसारित करून दोन गटामध्ये तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न केल्यास गुन्हा नोंद करून कठोर कारवाई करण्याचे निर्देश लातूरचे पोलीस अधीक्षक श्री अमोल तांबे यांनी सर्व ठाणेदारांना दिलेले आहेत.

लातुर जिल्ह्यामध्ये दोन समाजात व्देषभावना निर्माण करण्याचे उद्देशाने अथवा त्यांच्या भावना भडकावण्याचे उद्देशाने कोणताही इसम सोशल मिडीयाद्वारे पोस्ट किंवा व्हिडीओ प्रसारित करील त्याचेविरुद्ध कायदेशीर कडक कारवाई करण्यात येईल तसेच अशा प्रकारचे कोणी सोशल मिडीयाद्वारे पोस्ट किंवा व्हिडीओ प्रसारित करित असल्यास संबधीत पोलीस स्टेशन अथवा सायबर सेल लातुर येथे संपर्क करण्याचे आवाहन पोलीस अधिक्षक श्री अमोल तांबे, अपर पोलीस अधीक्षक श्री मंगेश चव्हाण, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री समिरसिंह साळवे यांनी केले आहे.

## स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठाच्या युवक महोत्सवाची तारीख बदलण्याची व्हीएस पँथर्सची मागणी

लातूर : येथील व्ही एस पँथर्स युवा संघटनेचे सं अध्यक्ष विनोदभाऊ खटके यांच्या नेतृत्वाखाली स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठ व्यवस्थापन समिती सदस्य तथा प्राचार्य डॉक्टर महादेव गव्हाणे यांची भेट घेऊन निवेदनाद्वारे नियोजित युवक महोत्सवाची तारीख बदलण्यात यावी अशी मागणी करण्यात आली सध्या मराठवाड्यामध्ये पावसामुळे बळीराजा हवालदिल झाला आहे ओला दुष्काळ सदृश परिस्थिती निर्माण झाली आहे त्यामुळे विद्यापीठाने आयोजित केलेला युवक महोत्सव नंतर घेण्यात यावा अन्यथा व्हीएस पँथर्स हा युवक महोत्सव व्ही एस पँथर्स हाणून पाडेल असा इशारा निवेदनाद्वारे देण्यात आला . यावेळी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष विनोद भाऊ खटके मराठवाडा अध्यक्ष निलेश कांबळे विद्यार्थी आघाडी जिल्हाध्यक्ष स्वप्निल कांबळे संपर्कप्रमुख आनंद जाधव विद्यार्थी आघाडी जिल्हा उपाध्यक्ष ऋषी ढगे प्रणव मालू सह पदाधिकारी उपस्थित होते .



## पावसाने जिल्ह्यातील शेतकरी प्रचंड संकटात असताना जिल्हा बँकेच्या संचालकाची मौजमजेसाठी परदेश वारी

लातूर : - गेल्या काही दिवसांपासून सततच्या अतिवृष्टी व मुसळधार झालेल्या पावसामुळे आणि नद्यांच्यापूर परिस्थितीमुळे लातूर जिल्ह्यातीलच नव्हे तर महाराष्ट्रातील शेतकरी प्रचंड संकटात सापडला त्यांना मदत करण्याऐवजी, आधार देण्याऐवजी लातूर जिल्हा बँकेच्या संचालकानी लाखो रुपयाची उधळपट्टी करून मौजमजेसाठी युरोप देशाच्या दौऱ्यावर जाण्याचा निंदनीय संतापजनक प्रताप असल्याची प्रतिक्रिया भाजपा नेते लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांनी व्यक्त केली आहे.

गेल्या काही दिवसापासून सर्वत्र प्रचंड अतिवृष्टी झाली. अनेक ठिकाणी ढगफुटी सारखा पाऊस झाला. नदी नाल्यांना पूर आले या सर्व नैसर्गिक आपत्तीत शेतकरी उध्वस्त झाला शेतातील खरिपाच्या पिकाबरोबरच फळबागा पाण्यात गेल्या. शेतीचे प्रचंड नुकसान झाले अनेक ठिकाणी जमिनी खरडून गेल्या. अनेकांच्या घराची पडझड झाली. शेतकऱ्यांसह नागरिक ही संकटाच्या कचाट्यात सापडले. जिकडे तिकडे चोहीकडे पाणीच पाणी अशी परिस्थिती निर्माण झाली. या नैसर्गिक आपत्तीत शेतकऱ्यांना आणि नागरिकांना दिलासा देणे नितांत गरजेचे आहे.



मुसळधार पावसामुळे आणि नद्यांना आलेल्या पुरामुळे अडचणीत सापडलेल्या संकटात आलेल्या शेतकरी बांधवांना मदत करण्याऐवजी शेतकऱ्यांचा पुळका दाखवणाऱ्या आणि स्वतःला सहकार महर्षी समजणाऱ्यांच्या नेतृत्वातील माजी आमदार अध्यक्ष असलेल्या लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालकानी आपल्या मौजमजेसाठी बँकेचे लाखो रुपये खर्च करून युरोपीयन देशाचा दौरा करत आहेत असा आरोप करून भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, हा दौरा रद्द करून दौऱ्यावर होणारा लाखो रुपयांचा खर्च मुख्यमंत्री सहाय्यता निधीला देता आला असता मात्र या संचालकांना शेतकऱ्यांच्या दुःखापेक्षा स्वतःची मौज मजा महत्त्वाची वाटली असावी असाही टोला त्यांनी मारला.

जिल्हा बँकेच्या बहुतांशी संचालकाना इंग्रजी भाषाही येत नाही इंग्रजीत बोलणे तर सोडा, एखाद्याने काही सांगितलेले तर समजतही नाही असे हे बहाद्दर संचालक परदेशात जाऊन काय दिवे लावणार कसली माहिती घेणार असा प्रश्न उपस्थित करून शेतकरी संकटात अडचणीत सापडला असताना परदेश दौऱ्यावर जिल्हा बँकेचे लाखो रुपये खर्च करणे हा अत्यंत खेदजनक आणि संतापजनक प्रकार असल्याचे भाजप नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी बोलून दाखविले.


दैनिक महावृत्त पहा ऑनलाईन कोठेही mhavratt.com या वेबसाईटवर पाहता येणार

## संपादकीय

# राजकीय 'पर्यावरण' धोकादायक वळणार

देश आज एका अत्यंत नाजूक वळणावर उभा आहे. हे वळण केवळ नैसर्गिक आपत्तींचे नाही, तर ते राजकीय आणि सामाजिक असंतोषाचेही आहे. मंदिर–मशिदीपासून ते डोंगर–पठार आणि बर्फाच्छादित सीमांपर्यंत, प्रत्येक ठिकाणी एक प्रकारची अस्वस्थता पसरलेली दिसत आहे. ही अस्वस्थता हेच दर्शवते की, समाजाचे आणि राजकारणाचे पर्यावरण सातत्याने बिघडत चालले आहे.

उमेश कुमार एकीकडे निसर्ग रौद्र अवतार दाखवत आहे, तर दुसरीकडे समाजात धार्मिक तेढ आणि राजकीय मतभेद टोकाला पोहोचले आहेत. या दोन्ही आघाड्यांवरील संकटं एकमेकांशी जोडलेली असून, ती देशाच्या भविष्यासाठी एक गंभीर आव्हान निर्माण करत आहेत. या सामाजिक अस्वस्थतेचे ताजे उदाहरण म्हणजे, उज्जैनमध्ये पेटलेले पोस्टर वॉर. २३ सप्टेंबर रोजी उज्जैनच्या ईदगाहवर अचानक 'आय लव्ह मोहम्मद' असे पोस्टर झळकले. पोलिसांनी ते तत्काळ हटवले; पण तोपर्यंत त्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर वेगाने पसरला होता. या घटनेला प्रत्युत्तर म्हणून दुसर्याच दिवशी कालिदास अकादमीमध्ये सुरू असलेल्या गरबा कार्यक्रमात 'आय लव्ह महाकाल'चे पोस्टर लावण्यात आले. वरकरणी या घटना किरकोळ वाटत असल्या, तरी त्या समाजाच्या ऐक्याला तडा देण्याचे काम करत आहेत. या प्रकारच्या घटनांमागे मतांचे ध–ुवीकरण करून निवडणुकीत फायदा मिळवण्याचा छुपा अजेंडा असतो; मात्र त्याचे गंभीर परिणाम समाजाला भोगावे लागतात.

पोस्टरच्या या राजकारणाची सुरुवात यापूर्वी कानपूरमध्ये झाली होती, जिथे 'आय लव्ह मोहम्मद' लिहिलेल्या पोस्टरवरून मोठा वाद निर्माण झाला होता. त्यानंतर इंदूरमध्येही असेच प्रकार घडले. हिंदुत्ववादी संघटनांनी याला शहराचे वातावरण बिघडवण्याचा प्रयत्न असल्याचे म्हटले. यावर विश्व हिंदू परिषदेने एक सूचक विधान केले. मुस्लीम समाज त्यांच्या धार्मिक कार्यक्रमांमध्ये हजरत मोहम्मद यांचे पोस्टर लावत असेल, तर त्यावर आक्षेप नाही; पण या कार्यक्रमांमध्ये घोषणाबाजी किंवा दुसर्या धर्मावर टीका–टिप्पणी केली गेली, तर ते अस्वीकारार्ह असेल, असे परिषदेने म्हटले. हे विधान एकाच वेळी सल्ला आणि इशारा दोन्ही देणारे आहे. एकीकडे सामाजिक वातावरण बिघडत असताना देशाचे राजकीय पर्यावरणही निरोगी नाही. सत्ताधारी पक्षापासून ते विरोधी पक्षांपर्यंत, सर्वच पक्षांमध्ये अंतर्गत संतुलनाचा अभाव दिसतो.

सत्ताधारी भाजपही याला अपवाद नाही. पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि मार्गदर्शक मंडळाचे सदस्य मुरली मनोहर जोशी आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यातील मतभेद पुन्हा एकदा समोर आले आहेत. जोशी यांनी पर्यावरणाच्या मुद्द्यावरून थेट सरकारच्या धोरणांवर टीका केली आहे. त्यांनी चारधाम महामार्ग प्रकल्पावर टीका करताना म्हटले की, डोंगरांमध्ये रुंद रस्ते बांधल्यामुळे भूस्खलन आणि अचानक येणार्या पुराच्या घटना वाढल्या आहेत. त्यांच्या मते हा प्रकल्प पर्यावरणासाठी धोकादायक आहे. जोशी यांनी राष्ट्रीय सुरक्षेचा मुद्दाही उपस्थित केला. सामान्यांची वाढती वर्दळ लष्कराच्या हालचालींमध्ये अडथळा आणू शकते, अशी भीती त्यांनी व्यक्त केली. काँग्रेसमध्येही गांधी घराण्याच्या नेतृत्वाविरोधात शशी थरूर आणि मनीष तिवारी यांच्यासारखे नेते सातत्याने आवाज उठवत आहेत. यावरून दिसते की, कोणत्याही पक्षात अंतर्गत लोकशाही आणि समन्वयाचा अभाव आहे.

सरकारच्या विकासनीती आणि नैसर्गिक आपत्ती यांच्यातील संबंध आता लपून राहिलेला नाही. महाराष्ट्रात यावर्षी एकाच वेळी पूर आणि दुष्काळ या दोन्ही टोकाच्या परिस्थितीने थैमान घातले. काही भागांत नद्यांनी गावेच्या गावे गिळंकृत केली, तर दुसरीकडे पाण्याअभावी शेतकर्यांचे कंबरडे मोडले. हे चित्र जल व्यवस्थापन आणि पर्यावरण संतुलनाबाबत गंभीर धोरणांचा अभाव असल्याचे स्पष्ट करते. उत्तराखंड, हिमाचल प्रदेश आणि जम्मू–काश्मीरमधील परिस्थिती तर आणखी भयावह आहे. विकासाच्या नावाखाली डोंगर पोखरून रुंद रस्ते, मोठे हॉटेल्स आणि जलविद्युत प्रकल्प उभारले जात आहेत. याचा परिणाम म्हणून भूस्खलन, ढगफुटी आणि दरडी कोसळण्याच्या घटनांमध्ये प्रचंड वाढ झाली आहे. तज्ज्ञ वारंवार इशारे देत आहेत की, हिमालयीन प्रदेश इतक्या मोठ्या प्रमाणात बांधकाम आणि यंत्रसामग्रीचा भार सहन करू शकत नाही; मात्र या इशार्यांकडे दुर्लक्ष करून निसर्गाशी खेळ सुरूच आहे, ज्याची किंमत निष्पाप लोकांना जीव गमावून चुकवावी लागत आहे.

उत्तराखंड आणि लडाख या राज्यांमधील घटना एका नव्या राजकीय क्रांतीचे संकेत देत आहेत. उत्तराखंडमध्ये बेरोजगार तरुण–तरुणी रस्त्यावर उतरून सरकारच्या धोरणांना आव्हान देत आहेत. विशेष म्हणजे, या आंदोलनाचे नेतृत्व मुली करत आहेत; मात्र त्यांच्या मागण्या ऐकून घेण्याऐवजी उत्तराखंडच्या मुख्यमंत्र्यांनी आंदोलकांना जिहादी संबोधून आगीत तेल ओतण्याचे काम केले. लडाखमध्ये गेल्या पाच वर्षांपासून सहाव्या अनुसूचीनुसार घटनात्मक संरक्षणाच्या मागणीसाठी आंदोलन सुरू होते. सरकारने याकडे सातत्याने दुर्लक्ष केले. अखेर लोकांच्या संयमाचा बांध फुटला आणि संतप्त जमावाने भाजपच्या कार्यालयाला आग लावली. सरकारने या घटनेला विदेशी शक्तींचे षड्यंत्र म्हटले असले, तरी हा स्थानिक लोकांच्या मनात वर्षानुवर्षे साचलेल्या असंतोषाचा स्फोट आहे. २०१९ मध्ये भाजपने लडाखला राज्याचा दर्जा देण्याचे आश्वासन दिले होते, जे अद्याप पूर्ण झालेले नाही.

धार्मिक ध्रुवीकरणाचे राजकारण, पक्षांतर्गत वाढता असंतोष, निसर्गाचा विध्वंस आणि तरुणांचा रस्त्यावरचा संघर्ष, ही सर्व लक्षणे एकाच गोष्टीकडे निर्देश करतात, देशाचे नैसर्गिक आणि राजकीय पर्यावरण गंभीर धोक्यात आहे. नेपाळ आणि बांगला देशचा इतिहास साक्षी आहे की, छोट्या वाटणार्या असंतोषाच्या ठिणग्याही मोठ्या राजकीय भूकंपात बदलू शकतात. लडाख आणि उत्तराखंडमधील घटना या केवळ किरकोळ विरोध नसून, त्या धोक्याची घंटा आहेत. सरकारने या आवाजाला दाबण्याचा प्रयत्न करण्याऐवजी त्यांच्याशी संवाद साधला पाहिजे. बेरोजगारी, आर्थिक विषमता आणि पर्यावरणाचा र्हास यावर ठोस उपाययोजना करण्याची आज नितांत गरज आहे; पण राजकीय पक्ष सध्या केवळ निवडणुकीच्या गणितांमध्ये गुंतले आहेत. प्रश्न हा आहे की, सरकार या बिघडत्या वातावरणाला वेळीच सावरणार का, की हा असंतोष आगामी निवडणुकांमध्ये आणि रस्त्यांवर एका मोठ्या वादळाचे रूप धारण करणार, याचे उत्तर भविष्याच्या उदरात दडलेले आहे

# विद्यार्थी व शाळेचे हित जपणारा हाडामासाचा शिक्षक बापूराव कांबळे सर

समाजामध्ये अशी काही माणसे असतात ती परिस्थिती पुढे हातबल न होता परिस्थितीवर मात करून आपले जीवन सुखी व्हावे आणि इतरांनी आपला आदर्श घ्यावा यासाठी ते सतत संघर्ष करतात असेच एक व्यक्तिमत्व ज्यांनी खडतर प्रवासातून आपली वाटचाल सुरू करून एक यशस्वी पल्ला गाठला ते म्हणजे मा. बापूराव कांबळे सर होय.

त्यांचा जन्म हावरगा ता. उदगीर येथे १०. ९ .१९६७ मध्ये गाव कुसाबाहेर अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत झाला त्यांच्या वडिलांचे नाव किशनराव तर आईचे त्रिवेणीबाई आहे. त्यांचे प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद प्राथमिक शाळा हावरगाव येथे झाले तर माध्यमिक शिक्षण हे घरची गरिबी असल्याने वसंत वस्तीगृह कुमठा येथे राहुन सरस्वती विद्यालयातून पूर्ण केले .

पुढे महाविद्यालयीन शिक्षण घेण्यासाठी अहमदपूर येथील महात्मा गांधी महाविद्यालयात प्रवेश घेतला आणि तिथेच पदवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. या कालावधीत तेथील व्यासंगी, अभ्यासू, प्राध्यापकांच्या सहवासात राहून त्यांच्या मनावर खूप चांगले संस्कार झाले पुढे पदवीत्तर शिक्षण घेण्यासाठी राजश्री शाहु महाविद्यालय लातूर येथे एम ए मराठीसाठी प्रवेश घेऊन एम ए पूर्ण केले. पुढे व्यावसायिक पात्रता ल.शव संत गाडगे महाराज अध्यापक महाविद्यालय संभाजीनगर येथुन पुर्ण केल्यानंतर दुर्गामाता पोस्ट बेसिक आश्रम शाळा नळगीर येथे काही काळ सुरुवातीला शिक्षक म्हणून नोकरी केली. पण कांबळे सरांचे मन तिथे रमत नव्हते तेवढ्यात झरी खू येथे किशनराव पाटील विद्यालयात मराठी विषयाची जागा रिक्त असल्याचे तेथील मुख्याध्यापक कदम सरांकडून समजले आणि २००३ मध्ये कांबळे सर झरी खु येथे शाळेवर मराठी, इतिहास, या विषयाचे माध्यमिक शिक्षक म्हणून रुजू झाले .

झरी खु हे गाव निसर्ग सौंदर्याने नटलेले चौहुबाजूंनी डोंगर, झाडी, दऱ्या, आणि परिसर भव्य दिव्य असा आहे या गावची लोकसंख्या दोन हजार असेल गावात मराठा, मुस्लिम, मांग, महार, लमाणी, गवंडी, लिंगायत, कोळी, हटकर, चांभार, इत्यादी जातीचे लोक गुण्यागोविंदाने आनंदाने राहतात या गावात सातवीपर्यंत जिप शाळा होती परंतु पुढील शिक्षणासाठी विद्यार्थ्यांची व त्यांच्या पालकांची खूप मोठी गैरसोय होती हे ओळखून गावातील दूरदृष्टी असलेले मा. बाळासाहेब पाटील यांनी झरी खु गावातील गोर ,गरीब, दिन, दलित ,विद्यार्थ्यांसाठी १९९२ मध्ये किशनराव पाटील माध्यमिक विद्यालय या नावाने शाळा सुरू केली त्यामुळे आठवी ते दहावी पर्यंत शिक्षण घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांची व पालकांची सोय झाली .

या शाळेत मुख्याध्यापक म्हणून शिस्तप्रिय, व्यासंगी, हुरहुन्नरी ,अभ्यासू, व्यक्तिमत्व असलेले गुणवंत कदम सर, भगवान शिंदे, कै.दीपक पोपळे, अविनाश सावंत, लिपिक हंसराज कदम, सेवक बाबुद्दीन सय्यद, नवनाथ कराड, परमेश्वर गायकवाड ,हे कार्यरत आहेत २००३ मध्ये बाबुराव कांबळे सर किशनराव पाटील विद्यालयात रुजू झाल्यानंतर या सर्व कर्मचाऱ्यांनी शाळेसाठी खूप मेहनत घेतली म्हणून ही शाळा आज नावारूपाला आली आहे. सर्वांनी विद्यार्थी हित लक्षात घेऊन झपाटून कार्य केले आहे आणि ते आजही करत आहेत सुरुवातीला ही शाळा गावातील समाज मंदिर, चावडीवर, भरत होती तदनंतर बाळासाहेब पाटील यांनी गावच्या बाहेर स्वतः च्या जागेत शाळा बांधून दिली त्यामुळे चोहु बाजूनी झाडे निसर्गरम्य वातावरण अशा वातावरणात ही शाळा आज खुप शोभुन दिसत आहे .

शाळेवर रुजू झाल्यानंतर शाळेला अनुदान नसल्याने कांबळे सरांना पगार मिळत नसल्याने संसाराचा गाडा कसा चालवावा हा खूप मोठा प्रश्न त्यांच्या समोर होता नायगाव तालुका चाकूर येथे त्यांची मोठी बहीण सौ. महानंदा कांबळे यांच्या घरी राहून नायगाव ते झरी खु असा सायकली वरून प्रवास करून शाळा केली या कालावधीत शाळेवर जाण्यास कधीही त्यांनी उशीर केला नाही आणि कोणासमोर आपल्या गरीबीचे भांडवलही केले नाही शाळेला अनुदान सुरू झाल्यानंतर नायगाव येथेच कांबळे सरांच्या घरी भाड्याने रूम घेऊन तिथुन सायकलवर नायगाव ते झरी खु असा प्रवास त्यांनी केला.



बापूराव कांबळे सरांनी २३ वर्षे आठवी ते दहावी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना त्यांच्याशी एकरूप होऊन मराठी आणि इतिहास हे विषय अतिशय सोप्या पद्धतीने शिकवले त्यांनी आपल्या वर्गात आनंददायी वातावरण निर्माण करून त्यांचा शारीरिक, मानसिक, नैतिक, विकास घडवून आणण्याचे कार्य केले आहे. सरांनी विद्यार्थी आणि शाळेच्या गुणवत्तेसाठी अत्यंत कठोर परिश्रम घेतले आहे आपला विद्यार्थी गुणवान व ज्ञानसंपन्न बनविण्यासाठी ते वेगवेगळ्या क्लुप्त्या वापरून आपले अध्यापन रसाळ करतात कांबळे सरांनी शिक्षकी एक पेशा म्हणून नाही ,तर ते एक व्रत म्हणून स्वीकारले आहे. म्हणून ते २३ वर्षे झरी खू येथे ज्ञानदाराचे पवित्र कार्य त्यांनी केले आहे .

म्हणून त्यांच्या शाळेतील अनेक विद्यार्थी डॉक्टर, सैनिक, पोलीस, सैनिक,व्यापारी ,उद्योजक, राजकारणी ,अशा विविध क्षेत्रात आपल्या कार्याचा ठसा उमटवत आहेत. सरांनी आपल्या विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान न देता नैतिक आणि सामाजिक मूल्यांचे शिकवण दिले आहे. त्यांनी आपला विद्यार्थी माणुसकी जपणारा असावा यासाठी आपले आयुष्य पणाला लावले आहेत म्हणून वाटते....

. अंधारूपी राक्षसाला
प्रकाशाचा दिवा पाहिजे
या मराठीच्या मातीला
बापूराव कांबळे सरांसारखा गुरू पाहिजे

बापूराव कांबळे हे सुद्धा शिस्तीचे असल्याने त्यांनी शाळेची कधीही प्रार्थना बुडवली नाही वेळेवर शाळेत येणे, टोल पडला की कसलाही विलंब न करता खडू डस्टर घेऊन वर्गावर जाणे, आणि विद्यार्थ्यांना समरस होऊन अध्यापन करणे, ही त्यांची जणूकाही सवयज बनली होती म्हणून ते प्रभावीपणे अध्यापन करायचे आजही झरी खु परिसरातील आजी माजी विद्यार्थी कांबळे सरांचे नाव मोठ्या आदराने घेतात

कांबळे सरांचे विद्यार्थ्यावर, शिक्षणावर, अध्यापनावर, माणसावर, पालकावर, प्रचंड निष्ठा आहे. म्हणूनच आपल्या नोकरीच्या कालावधीत आपल्या सहकार्यासोबत त्यांचा कधी वाद–विवाद झाल्याचे ऐकीवात नाही शिक्षक असावा तर कांबळे सरांसारखा अशीच त्यांची प्रतिमा आहे. अत्यंत गरिबीतून हावरगा येथुन सुरू झालेला खडतर प्रवास आज निवांत सागराकडे येऊन अहमदपूर येथे विसावला आहे. या प्रवासात त्यांची पत्नी सौ छायाताईची ही भूमिका महत्त्वाची आहे. सरांना दोन मुले हावरगेकर हर्षवर्धन एम. ए .बी एड. असून हावरगेकर प्रबोधन एम. एससी. बी एड .तर मुलगी सौ हाटखिळे प्रतिक्षा एम. ए. बी एड. असून जावई पोलीस खात्यात अधिकारी आहेत .

सरांनी आपल्या सर्व मुलांना शिक्षण देऊन उच्चशिक्षित केले आहे ते आज आपापल्या क्षेत्रात कार्यरत आहेत कांबळे सर ३० सप्टेंबर २०२५ रोजी सेवानिवृत्त होत आहेत शेवटी त्यांच्याबद्दल म्हणावेसे वाटते काही माणसे......

मोर पंखासारखी
काही माणसे असतात
मनाच्या पुस्तकात
जपून ठेवावीशी वाटतात

तसे कांबळे सर आहेत आयुष्याच्या प्रत्येक वळणावर तुमच्या आयुष्यात आनंद यावा व पुढील प्रवासही हसरा आणि आनंद देणारा असावा आपणास सेवानिवृत्तीच्या माझ्या वतीने खूप खूप मंगलमय शुभेच्छा देऊन मी थांबतो.

************

आपला मित्र,
प्रा.वैजनाथ सुरनर
साहित्यिक
सिद्धेश्वर कनिष्ठ महाविद्यालय झरी बु ता चाकुर
मो न.९४२१३७७९८५

# समतेचा नवा पहाटेचा सूर्योदय : धम्मचक्र प्रवर्तन दिन

धम्म म्हणजे समतेचा दीप, प्रवर्तन दिन म्हणजे स्वाभिमानाचा उत्सव आणि धम्मचक्र प्रवर्तन म्हणजे अन्यायाविरुद्ध बंड, पण हिंसेशिवाय. म्हणजेच, गुलामीतून स्वाभिमानाकडे प्रवास, अन्यायाविरुद्ध बंडाचे प्रतीक आणि समतेच्या नवा समाजव्यवस्थेचे बीजारोपण. १४ ऑक्टोबर १९५६ हा दिवस भारतीय समाजाच्या इतिहासात कायमस्वरूपी सुवर्णाक्षरांनी कोरला गेला आहे. नागपूरच्या पवित्र दीक्षाभूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लाखो अनुयायांसह बौद्ध धम्म स्वीकारून एका नवा युगाचा प्रारंभ केला आणि शतकानुशतकांची गुलामगिरी, शोषण, जातिभेद यांना छेद देत नवा युगारंभ केला. हा क्षण केवळ धर्मांतराचा नव्हता, तर तो होता मनुष्याला मनुष्य म्हणून जगण्याचा, समतेने श्वास घेण्याचा आणि आत्मसन्मानाने उभं राहण्याचा क्रांतिकारी क्षण. हा दिवस भारतीय इतिहासातील एक क्रांतिकारी वळण आहे. हाच तो क्षण होता ज्याने दलित, शोषित, वंचित समाजाला माणूस म्हणून जगण्याचा अधिकार दिला. त्यामुळे १४ ऑक्टोबर हा केवळ दिनदर्शिकेतील एक दिवस नसून, तो आशेचा, स्वाभिमानाचा आणि क्रांतीचा दिवस आहे. धम्मचक्र प्रवर्तनाचा सामाजिक संदेश, ते माणसाला माणसासमान जगण्याची शिकवण देते. बौद्ध धर्म हा स्वातंत्र्य, समता आणि बंधुता यांचा अधिष्ठान आहे ज्यात कोणतीही जात नाही, उच्च–नीचपणाचा भेद नाही. त्यामुळे धम्म स्वीकारणे म्हणजे आत्मसन्मान स्वीकारणे.

बाबासाहेबांनी सारनाथच्या धम्मचक्र फिरवणाऱ्या बुद्धांच्या परंपरेशी संगती साधत, आश्विन पौर्णिमेला दीक्षाभूमीवर धर्मचक्र फिरवले. त्या एका कृतीने त्यांनी पिढ्यान् पिढ्या चालत आलेल्या दास्याच्या साखळ्या तुटल्या आणि समतेच्या धर्माचा नवा प्रवास सुरू झाला. भारताच्या दीर्घ सामाजिक इतिहासात जातिव्यवस्था ही जखम होती. शेकडो वर्षे दलित समाजाला अपमान, अन्याय, अस्पृश्यतेच्या यातना सोसाव्या लागल्या. डॉ. आंबेडकरांनी आपल्या अभ्यास, संघर्ष आणि त्यागातून या व्यवस्थेविरुद्ध आवाज उचलला. अखेर त्यांनी ठामपणे जाहीर केले की, मी हिंदू म्हणून जन्मलो असलो तरी हिंदू म्हणून मरणार नाही आणि आपल्या शब्दाला जागत १४ ऑक्टोबर १९५६ रोजी त्यांनी बौद्ध धर्माची दीक्षा घेऊन लाखो जनतेला नवजीवन दिले. त्यामुळे या दिवसाला ऐतिहासिक महत्त्व आहे. या दिवशी बाबासाहेबांनी जे धाडस केले, त्यातून दलित समाजाने आपली गुलाम मानसिकता झटकून टाकली, हा दिवस म्हणजे स्वाभिमान दिन आहे. भगवान बुद्धांनी दिलेला धम्म हा कोणत्याही देवधर्माच्या अधीन नसून करुणा, प्रज्ञा आणि मैत्री यांवर आधारलेला आहे. त्यांनी शोषण, अंधश्रद्धा आणि हिंसेला नाकारलं, अत्त दीपो भव हा त्यांचा संदेश मानवाला आत्मबळ देणारा ठरला. जातीपातीच्या अंधाऱ्या विळख्यात अडकलेल्या समाजाला त्यांनी समानतेचा आणि ज्ञानाचा दीप दाखवला. बुद्ध धम्म हा कर्मकांडांचा मार्ग नाही, तर व्यवहाराचा आणि विचारांचा मार्ग आहे. माणसाला माणूस म्हणून जगायला शिकवणारा हा जीवनमार्ग आजही तितकाच सुसंगत आणि आवश्यक आहे.

धम्मचक्र प्रवर्तन दिन केवळ स्मरणोत्सव नसून तो आहे सतत जागवणारा चेतावणीचा नगारा. विषमता, दारिद्र्य, अन्याय अजूनही समाजात आहे, अशा परिस्थितीत आजच्या पिढीसाठी १४ ऑक्टोबरचा संदेश असा आहे की, समता, न्याय आणि करुणा अधिक सामर्थ्याने पसरवण्याची गरज आहे. हा फक्त एका धर्मांतराचा दिवस नाही. तो भारतीय समाजाच्या पुनर्जन्माचा दिवस आहे. ज्यांनी अस्पृश्यतेच्या अंधःकारातून प्रकाशाकडे वाटचाल केली, त्यांचा हा उत्सव आहे. म्हणूनच आपण हा दिवस केवळ साजरा करावा असे नाही, तर जीवनपद्धतीत उतरवावा. तो होता मनुष्यत्वाचा उत्सव, तो होता अस्मितेचा पुनर्जन्म, तो होता न्याय, समता आणि बंधुत्वाच्या नव्या वाटचालीचा आरंभ. बाबासाहेबांनी दिलेल्या २२ प्रतिज्ञा म्हणजे केवळ धार्मिक विधी नव्हते, तर मानसिक गुलामीतून मुक्त होण्याचा शपथविधी होता. त्या दिवशी दीक्षाभूमीवर एकत्र जमलेला जनसागर पाहताना असे वाटले. जणू अंधाराने त्रस्त झालेले लाखो तारे एका सूर्याच्या प्रकाशाने उजळून निघाले. लोकांच्या डोळ्यांत अश्रू होते, पण ते दु:खाचे नव्हते; ते होते आनंदमुक्तीचे अश्रू. शतकानुशतके अपमान सहन केलेल्या समाजाने पहिल्यांदाच उंच मान करून मोकळा श्वास घेतला. हा दिवस आपल्याला आठवण करून देतो की समता, बंधुता आणि स्वातंत्र्य या शिवाय मानवतेला अर्थ नाही. तसेच, हा दिवस आपल्याला शिकवतो की खरी ताकद ही संघटनेत, शिक्षणात आणि विचारांत आहे. बाबासाहेबांनी या दिवशी केवळ धर्मबदल केला नाही, तर त्यांनी समाजबदलाचा पाया घातला. त्यांनी दाखवलेला मार्ग हा विज्ञाननिष्ठ, तार्किक आणि मानवी अस्मिता जपणारा होता. आज, जेव्हा समाजात अजूनही असमानता, द्वेष आणि भेदभावाचे काटे टोचतात, तेव्हा धम्मचक्र प्रवर्तन दिन आपल्याला पुन्हा पुन्हा जागं करतो. त्याकरिता आपण बुद्धधम्माचे वारसदार म्हणून करुणा आणि मैत्रीची बीजे रुजवली पाहिजेत. जात, धर्म, पंथ यांच्या भिंती मोडून प्रबुद्ध समाज निर्माण केला पाहिजे आणि अन्यायाविरुद्ध ठामपणे उभे राहणे, हीच खरी बाबासाहेबांना आणि बुद्धांना खरी वंदना ठरते.

नागपूरची भूमी, लाखोंचा सागर आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा तेजोमय संकल्प! तो फक्त एक दिवस नव्हता; तो पिढ्यान् पिढ्यांच्या अश्रूंचा शेवट आणि मानवतेच्या नव्या पहाटेचा उदय होता. या दिवशी दीक्षाभूमीवर एकत्र आलेल्या जनसमुदायाची अवस्था डोळ्यांसमोर आणली, तर अंगावर शहारे येतात. शतकानुशतकांच्या अन्यायाचे ओझे त्या दिवशी हलके झाले. आता आपणही माणूस आहोत, समान हक्काचे आहोत ही भावना आणि भावनिक दृष्टीकोन त्यांच्या चेहऱ्यावर झळकत होती. तो केवळ धर्मांतर नव्हता; ती मानवी स्वातंत्र्याची घोषणा होती. आज आपल्याला १४ ऑक्टोबरचा वारसा पुढे नेण्याची गरज आहे. कारण जातिव्यवस्था आजही वेगवेगळ्या स्वरूपात दिसते. धम्मचक्र प्रवर्तन दिन हा केवळ उत्सव नाही, तर तो आहे आपल्या अस्तित्वाची ओळख. हा दिवस आपल्याला सांगतो, भूतकाळातील बेड्या आपण तोडल्या आहेत, आता भविष्याच्या प्रगतीचे दार आपण स्वतः उघडायचे आहे. म्हणूनच या दिवशी आपण सर्वांनी करुणा, प्रज्ञा आणि समतेच्या मार्गावर चालत प्रबुद्ध भारत घडवण्याची प्रतिज्ञा करूया. १४ ऑक्टोबरच्या त्या ऐतिहासिक दिवशी सुरू झालेल्या प्रबुद्धतेच्या प्रवासाला आजही नवी ऊर्जा मिळो. धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या हार्दिक शुभेच्छा !

************

प्रविण बागडे
नागपूर
भ्रमणध्वनी : ९९२३६२०९१९

# हरित ऊर्जेचा रोडमॅप

अपारंपरिक ऊर्जा स्रोत, सौरऊर्जा जैव उत्पादने आणि जैव सेवांच्या क्षेत्रातील पुरवठासाखळी चक्रीय रूपात प्रस्थापित करणे आणि त्यातून चक्रीय जैवअर्थव्यवस्था उभारण्याला गती देण्याचे काम भारतीय अर्थव्यवस्था करत आहे.

जैवइंधन या संकल्पनेचा जन्म भारत ऊर्जा सप्ताहाच्या पहिल्या परिषदेमध्ये झाला. याचे कारण जगात ऊर्जेची मागणी दिवसेंदिवस वाढत असताना प्रत्येक देश स्वस्त ऊर्जा निर्मिती करण्यासाठी प्रयत्न करत आहे. भारत देशदेखील यासाठी प्रयत्न करत आहे, वर्ष २०४५ पर्यंत देशात ऊर्जेचा वापर दुपटीने वाढणार आहे. भारत जगातील तिसरा सर्वात मोठा ऊर्जा, इंधन आणि घरगुती गॅस यांचा ग्राहक आहे. अपारंपरिक ऊर्जा स्रोतांपैकी सौर ऊर्जा हे ऊर्जेचे शक्तिस्थान आहे असे अभ्यासातून दिसून आले आहे. एका तासामध्ये सूर्य पृथ्वीला एवढी ऊर्जा देतो की जी एका वर्षासाठी जागतिक ऊर्जेची गरज भागवू शकते. पारंपरिक ऊर्जा स्रोतांबरोबरच अपारंपरिक ऊर्जा स्रोतांचा वापर करणे ही आज काळाची गरज झाली आहे. त्याचे महत्त्व काय आहे हे पाहणे महत्त्वाचे आहे.

स्वस्त ऊर्जा : आपल्याकडे बारा महिने सूर्यप्रकाश असतो. अशावेळी सौरऊर्जा साठवणार्या बॅटरीज आणि त्याचे वितरण जाळे यामध्ये गुंतवणूक श्रेयस्कर ठरणार आहे. त्यामुळेच देशात सौरऊर्जा निर्मितीला प्रोत्साहन देण्यासाठी 'सोलर पॉवर ग्रीड'च्या निधीत दुप्पट वाढ केली आहे. गेल्यावर्षी 'सोलर पॉवर ग्रीड'साठी साधारणत: ४ हजार ९७० कोटी रुपयांची तरतूद होती, यंदा ही तरतूद ८ हजार ५०० कोटी रुपयांपर्यंत वाढवली आहे. येमेन, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड आणि नॉर्वेसारखे देश अपारंपरिक ऊर्जास्रोतांवर कार्यरत आहेत.जगभरात वाढणार्या विजेच्या किमती या पर्यायांमुळे ५० टक्क्यांनी खाली येऊ शकतात.

ग्रीन हायड्रोजन मिशन : युक्रेन–रशिया युद्धामुळे इतक्या मोठ्या प्रमाणावर ऊर्जा संकट कोसळले की एक भीषण परिस्थिती ओढवली गेली. युरोपचे काही भाग तर पूर्णपणे गारठले गेले. अशावेळी घरे, कार्यालये, सार्वजनिक सेवा ऊबदार ठेवायला इंधन आवश्यक आहे. इंधनाचा सर्वात मोठा उत्पादक देश म्हणजे रशिया. त्याच्याकडून येणारा पुरवठा पूर्णपणे थांबलेला असताना अशा परिस्थितीत देश टिकवायला, माणसे जगवायला, रोजचे रहाटगाडगे चालू ठेवायला युरोपमधल्या देशांना कोळसा आणि तेलाचे अधिक उत्पादन घेणे अथवा आयात करणे याशिवाय दुसरा कुठलाही उपाय नाही. कोळसा आणि तेल वापराचे दुष्परिणाम वातावरणातले तापमान वाढण्यावर आणि कार्बन उत्सर्जनाचे प्रमाण नियंत्रणाबाहेर जाण्यात होणार आहे.

या सर्व परिस्थितीत जगभरातले सर्व विचारवंत, संशोधक सध्या अपारंपरिक ऊर्जास्रोतांद्वारे स्वच्छ हरित ऊर्जा मोठ्या प्रमाणावर कशी बनवता येईल, यासाठी प्रयत्न करत आहेत. संपुष्टात येणार्या, वातावरण बिघडवणार्या, कोळसा आणि तेलावरचे अवलंबित्व कमी करणे हीच सध्या प्राथमिकता बनली आहे. त्यासाठीच भारताने हरित विकास कार्यक्रमांतर्गत 'ग्रीन हायड्रोजन मिशन'द्वारे ऊर्जानिर्मिती करण्यासाठी गेल्यावर्षी २९७ कोटी रुपयांची तरतूद केली होती. यंदा ही तरतूद जवळपास दुप्पट केली असून ती ६०० कोटी रुपयांपर्यंत वाढविली आहे. हरित ऊर्जेला प्रोत्साहन देण्यासाठी सागरी किनारपट्टीवर ऑफशोअर पवन ऊर्जा (ऑफशोअर विंड एनर्जी) निर्मिती प्रकल्पांना मदत केली जाणार आहे.

सौरऊर्जा निर्मितीतून पैसे कमाविण्याची संधी : सहज उपलब्ध होणारा ऊर्जेचा स्रोत म्हणजे सूर्य. सूर्याकडून जसा प्रकाश मिळतो तसेच त्याच्यापासून निर्माण होणार्या उत्सर्जित किरणांमुळे तापमानवृद्धी होते. सूर्यकिरणे पडल्यामुळे पृथ्वी उबदार बनते, वातावरण राहण्यालायक बनते. या उबदार हवामानामुळेच वारे वाहू लागतात. पाण्याचे प्रवाह बनतात आणि पुढे या सूर्यापासून सौरऊर्जा, वार्यापासून ऊर्जा आणि नद्या–धबधब्यांपासून जलविद्युतनिर्मिती होते, हे अव्याहतपणे सुरू आहे. आजमितीला वापरल्या जाणार्या विजेपैकी १० टक्के वीज ही सौरऊर्जा आणि वार्यापासून निर्माण केली जाते.

# उपवर्गीकरणाने संवैधानिक समूहाच्या एकीचे बळ नष्ट होईल_ बी. बी. मेश्राम

# १३५ वी वैचारिक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा संपन्न.

छत्रपती संभाजी नगर /प्रतिनिधी : फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशन व दि ऑल इंडिया नाग असोसिएशन (आईना) च्या संयुक्त विद्यमाने संस्थेचे जनसंपर्क कार्यालय, ४, साकेत नगर, भावसिंगपुरा रोड, छत्रपती संभाजी नगर, महाराष्ट्र येथे पक्षाच्या व जातीच्या सहकार्यानेच राजकीय पेच सुटतील. तसेच सार्वजनिक पैशाचा अपहार करण्यासारखे दुसरे नीच कृत्य नाही. या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विधानाच्या ८१ व्या व ७३ व्या वर्धापन दिनानिमित्त सदरील प्रासंगिक विषयावर १३५ वी वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा २८ सप्टेंबर २०२५ ला संपन्न झाली. फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशनचे संचालक बी. बी. मेश्राम अध्यक्षीय मार्गदर्शन करताना म्हणाले की, भारत हा एक जाती प्रधान देश असल्यामुळे जातीजातीत विभाजित असणाऱ्या पक्षातील समस्या त्यांच्या सहकार्यानेच सोडविल्या जाऊ शकतात. याचे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी राजमहेंद्री येथील महानगरपालिकेतर्फे प्रदान करण्यात आलेल्या मानपत्राला उत्तर देताना २८ सप्टेंबर १९४४ ला स्पष्टीकरण दिलेले आहे. तसेच शे. का. फेडरेशन, शे. का. इ. ट्रस्ट, न्यू कामगार संघ, महार ज्ञाती पंचायत, समता सैनिक दल यांच्या संयुक्त विद्यमाने २८ सप्टेंबर १९५२ ला आयोजित संमेलनात बोलताना बाबासाहेब म्हणाले होते की कुणबी, मराठा, क्षत्रिय, ब्राह्मण यांची जशी ज्ञातिगृहे आहेत, तशी आपलीही असायला हवीत करिता त्यांनी इमारत फंड जमा करायला सुरुवात केली होती. त्याचा विनियोग योग्य प्रकारे व्हावा म्हणून सार्वजनिक पैशाचा अपहार करण्यासारखे नीच कृत्य दुसरे नाही. याची त्यांनी कार्यकर्त्यांना जाणीव करून दिली होती. वर्तमानात अनुसूचित जाती या संवैधानिक प्रवर्गाच्या उपवर्गीकरणावर चर्चा होताना दिसत आहे. याचा फायदा किमान त्या मागणी करणाऱ्यांना तरी होणार आहे काय? मागणी करणाऱ्यांना सुद्धा फारसा लाभ होणार नाही तर उलटपक्षी उप वर्गीकरणाने संवैधानिक समुहाच्या एकीचे बळ नष्ट होईल. याची वास्तविकता संदर्भासह त्यांच्यापर्यंत पोहोचविली पाहिजे. त्याचे उघड्या डोळ्यांनी भान ठेवून समाज जीवनात मार्गक्रमण केले पाहिजे. करिता आपण सदरील प्रासंगिक विषयावर जाणीवपूर्वक चर्चा करीत आहोत. हा संदेश आपण जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रचार प्रसाराचे कार्य करावे.




उद्घाटनपर मार्गदर्शन करताना सामाजिक कार्यकर्ते विलास कटारे म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बुद्ध कबीर फुले या आदर्शांच्या मानवी कल्याणाची भाषा स्वीकारली होती. त्यांनी आम्हाला शासनकर्ती जमात व्हा! असा संदेश दिला होता. करिता विचारधारेच्या प्रचार प्रसाराची यंत्रणा निर्माण केली पाहिजे. समस्या अनेक असल्या तरी मार्ग काढावे लागतील. समाजमन जागृत करण्यासाठी प्रयत्न करूया.

प्रमुख वक्ते म्हणून मार्गदर्शन करताना डॉ. रमेशचंद्र धणेगावकर म्हणाले की, विचारांचा प्रचार प्रसार आणि त्याचे संवर्धन हे फार कठीण कार्य आहे जे या फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशन मार्फत केले जाते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर तत्कालीन परिस्थितीत अनेक विरोधकांना मात करीत परिस्थितीला सामोरे गेले. या चळवळीचा रथ इथपर्यंत आणला आहे. पुढे नेता आला नाही तर किमान मागे तरी जाऊ देऊ नका असा त्यांनी आपणास संदेश दिला होता. म्हणून समाजातील प्रशासकीय उच्च अधिकाऱ्यांनी दिशा देण्याचे काम केले पाहिजे.

याप्रसंगी टी. एन. थोरात म्हणाले की, सदरील परिषदेत राजेमहेंद्री महानगरपालिकेतर्फे डॉ. आंबेडकरांना मानपत्र देण्यात आले होते. इमारत फंडासाठी पैसा जमा करण्याचे आवाहन करत असताना सदरील पैशाचा सदुपयोग करून जनतेला हिशेब दिला पाहिजे. ॲड. विलास रामटेके म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्याच काळात शिकल्या सवरलेल्या लोकांवर अविश्वास व्यक्त केला होता. ज्याचे परिणाम आज आपणाला पाहायला मिळत आहेत.

सुरुवातीला आदर्शांना मान्यवरांच्या हस्ते पुष्पमाला व पुष्प अर्पण करण्यात आले तर स्टडी फाउंडेशनच्या वतीने मान्यवरांचे व उपस्थित प्रतिनिधींचे स्वागत करण्यात आले. सूत्रसंचालन ॲड. विलास रामटेके तर प्रास्ताविक व आभार महादेव डांबरे यांनी व्यक्त केले. या कार्यशाळेला बी. बी. मेश्राम, ॲड. विलास रामटेके, विलास कटारे, ए. जी. नाईक, डॉ. रमेशचंद्र धनेगावकर, महादेव डांबरे, टी. एन. थोरात इत्यादी प्रतिनिधी उपस्थित होते.

# प्रज्ञा ही अनुभवातून जन्मलेली जाणीव आहे – प्रविण मोरे

मुंबई :– प्रज्ञा म्हणजे फक्त बुद्धिमत्ता किंवा पुस्तकी ज्ञान नव्हे तर प्रज्ञा म्हणजे सत्य आणि असत्य यामधील सूक्ष्म फरक ओळखण्याची क्षमता, सुज्ञपणे विचार करून कृती करण्याची योग्यता आहे, जी केवळ पुस्तकी माहिती नसून ती अनुभव, अंतर्ज्ञान आणि सद्विवेक बुद्धी यांचे एकत्रित असे मूर्तरूप आहे. भगवान बुद्धांनी सांगितले आहे की दुःखाची खरी मुळे लोभ, द्वेष आणि मोह यात आहेत. या त्रिविकारांवर मात करण्यासाठी शील, करुणा आणि प्रज्ञा या तीन गोष्टींचा आधार घ्यावा लागतो; त्यापैकी प्रज्ञा आपल्याला अज्ञानाचा नाश करून वस्तुस्थितीचे खरे आकलन करून देते. व्यवहारातही प्रज्ञेचे मोठे महत्त्व आहे कारण ती आपल्याला विवेक देते, योग्य–अयोग्य ठरवण्याची ताकद देते, आपला प्रत्येक निर्णय लोभ, स्वार्थ आणि अहंकार यावर आधारित न घेता तो सत्य, तर्क आणि करुणा यांच्या आधारे घ्यावा हे प्रज्ञा आपल्याला शिकवते म्हणूनच प्रज्ञा ही फक्त एक संकल्पना नाही तर ती अनुभवातून जन्मलेली जाणीव आहे, जी आपल्याला आयुष्य योग्य दिशेने नेते आणि खरी समृद्धी देते असे प्रतिपादन प्रविण गजानन मोरे यांनी बौद्धजन पंचायत समितीच्या वर्षावास मालिकेचे तेरावे पुष्प गुंफत प्रज्ञा, शील, करुणा या विषयावर बोलत असताना केले. बौद्धजन पंचायत समिती संलग्न संस्कार समिती यांच्या संयुक्त विद्यमाने वर्षावास प्रवचन मालिकेचे आयोजन करण्यात आले आहे त्या प्रवचन मालिकेचे तेरावे पुष्प उपकार्याध्यक्ष मनोहर सखाराम मोरे यांच्या अध्यक्षतेखाली डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक सभागृह, परेल, मुंबई – १२ येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाले. सदर कार्यक्रमाचे प्रस्ताविक व सूत्रसंचालन मनोहर बा. मोरे यांनी आपल्या धीरगंभीर पहाडी आवाजात केले प्रस्ताविक सादर करते वेळी त्यांनी आदर्श बौद्धाचार्य, पाली भाषेतील एम.ए. व पेशाने वकील असलेल्या प्रवचनकार प्रविण मोरे यांची सभागृहाला ओळख करून दिली, सोबतच स्मारकाच्या निधी करता बौद्धाचार्य, बौद्धाचार्या यांनी सढळ हस्ते धम्मदान करीत आपली मदत ऑक्टोबर पर्यंत जमा करावी असे आवाहन केले. अध्यक्षीय भाषणात उपकार्याध्यक्ष मनोहर सखाराम मोरे यांनी प्रवचनकार प्रविण मोरे यांनी प्रज्ञा, शील, करुणा या विषयावर बोलत असताना अत्यंत मुद्देसूद मांडणी करीत प्रज्ञा, शील, करुणा योग्य विवेचन करीत त्याचे मानवी आयुष्यातील महत्व सर्वसामान्यांनाही समजेल इतक्या साध्या व सोप्या परंतु प्रभावी भाषेत सौंदहरणासह विशद केले त्याबद्दल त्यांचे कौतुक केले व त्यांना सन्मानित करून त्यांना पुढील वाटचालीस मंगलकामना दिल्या. सदर प्रसंगी उपकार्याध्यक्ष एच. आर. पवार यांनीही सभागृहाला संबोधित करून प्रज्ञा, शील, करुणा या विषयावर आपले अमूल्य असे विचार व्यक्त केले.




सदर प्रसंगी बौद्धजन पंचायत सरचिटणीस राजेश घाडगे, पतसंस्थेचे अध्यक्ष किशोर मोरे, राजाभाऊ तथा रामदास धो. गमरे, महेश शिवराम पवार, महेंद्र कांबळे, धृपद मोरे, मिलिंद जाधव, मंगेश जाधव, दर्शन कांबळे, संतोष सावरकर, संदेश गमरे, तुकाराम घाडगे, माजी चिटणीस, अंजलीताई मोहिते, सचिव सावी, विश्वस्त मंडळ, मध्यवर्ती कार्यकारिणी, सर्व शाखांचे पदाधिकारी, सभासद, महिला मंडळ, बौद्धाचार्य, बौद्धाचार्या, विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. सरतेशेवटी मनोहर बा. मोरे यांनी सदर कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी अथक परिश्रम घेणाऱ्या सर्वांचे, प्रवचनकार प्रविण मोरे व उपस्थितांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.

## ‘राजकारण करू नका, तुमची मदत वाढवा’ ; जिल्हाधिकाऱ्यांनी खडेबोल सुनावलेल्या ज्योती वाघमारे कोण आहेत?

धुव्वाधार झालेल्या पावसाचा फटका मराठवाड्यासह अनेक भागांना बसला आहे. सोलापूरच्या सीना नदीला पूर आल्याने आसपासच्या गावांमध्ये पूराचे पाणी शिरले असून त्याचा मोठा फटका माळा, मोहोळ उत्तर सोलापूर आणि दक्षिण सोलापूर तालुक्यातील गावांना बसला आहे.

पावसामुळे शेतकऱ्यांचेही प्रचंड नुकसान झाले आहे. याच पार्श्वभूमीवर राजकीय नेत्यांकडून येथील गावात जाऊन पाहणी केली जात आहे. शेतकऱ्यांचे पंचनामे किंवा मदत मिळत नसल्याच्या कारणावरून संबंधित अधिकाऱ्यांना नेत्यांकडून फोन लावून झापलं जात असल्याचे अनेक व्हिडीओ समोर आल्यानंतर आता चक्क जिल्हाधिकाऱ्यांनी शिंदे सेनेच्या नेत्या ज्योती वाघामारे यांना खडेबोल सुनावल्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल झाला आहे.

ज्योती वाघमारे आणि पक्षाचे प्रमुख नेते सोलापूरमध्ये विविध ठिकाणी जाऊन पूरग्रस्तांना अन्नधान्याचे किट वाटप करत आहेत. या दरम्यान वाघमारे यांनी थेट सोलापूरचे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांना फोन केला. त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांवर प्रशासनाकडून अपुरी मदत मिळत असल्याचा ठपका ठेवण्याचा प्रयत्न केला. मात्र, जिल्हाधिकाऱ्यांनी वाघमारे यांना आता राजकारण करण्याची वेळ नाही, तुमचं राजकारण नंतर करा, अशा शब्दांत सुनावलं आहे. या दोघांच्या संवादाचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे.

# मागच्या ४० वर्षात मांजरा परीवाराने लातूर जिल्हयातील ग्रामीण भागात आर्थिक क्रांती घडवण्याची उज्वल परंपरा निर्माण केली – माजी मंत्री आ.अमित देशमुख

## विलास सहकारी साखर कारखाना अधिमंडळाची २३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न

वार्षीक सर्वसाधारण सभेत गत गळीत हंगामात सर्वांधीक ऊसउत्पादन करणारे सभासद, ऊसवाहतुक ठेकेदार, ऊस्तोडणी वाहतुक ठेकेदार, हार्वेस्टर ठेकेदार, मीनी ट्रॅक्टर ठेकेदार यांचा सत्कार करण्यात आला. बाभळगाव विभागात सर्वांधीक ऊसउत्पादन ६७६.४८४ मे.टन ऊसाचे उत्पादन घेतल्या बददल चेअरमन वैशाली विलासराव देशमुख यांचा सत्कार करण्यात आला.

लातूर / प्रतिनिधी :– मागच्या ४० वर्षात मांजरा परीवाराने लातूर जिल्हयातील ग्रामीण भागात आर्थिक क्रांती घडवण्याची उज्वल परंपरा निर्माण केली आहे. या कार्याचा विस्तार करुन आगामी ४० वर्षाच्या काळात ही पंरपरा अधिक उज्वल करण्याचा प्रयत्न राहील अशी ग्वाही राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री तथा महाराष्ट्र विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे मुख्य प्रतोद आमदार अमित विलासराव देशमुख यांनी विलास साखर कारखाना वार्षीक सर्वसाधारण सभेत बोलतांना ग्वाही दिली.

सोमवार दि. २९ सप्टेंबर २५ रोजी दुपारी लातूर शहरातील हॉटेल वैष्णव बँकवेट हॉल येथे विलास सहकारी साखर कारखाना अधिमंडळाचीची २३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा चेअरमन वैशालीताई विलासराव देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. यावेळी राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री तथा महाराष्ट्र विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे मुख्य प्रतोद आमदार अमित विलासराव देशमुख, खासदार डॉ. शिवाजी काळगे, व्हा. चेअरमन माजी आमदार वैजनाथ शिंदे, कार्यकारी संचालक आबासाहेब पाटील, रेणा सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अनंतराव देशमुख, व्हा. चेअरमन प्रवीण पाटील, लातूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष अभय साळुंके, लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष किरण जाधव, विकासरत्न विलासराव देशमुख मांजरा शेतकरी सहकारी साखर कारखान्याचे व्हाईस चेअरमन अशोक काळे, लातूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती जगदीश बावणे, उपसभापती सुनील पडीले, श्री संत शिरोमणी मारुती महाराज सहकारी साखर कारखान्याचे व्हा. चेअरमन सचिन पाटील, ट्वेंटीवन शुगर चेअरमन विजय देशमुख, माजी चेअरमन धनंजय देशमुख, माजी महापौर दिपक सूळ, रेना सहकारी साखर कारखान्याचे माजी चेअरमन सर्जेराव मोरे, लातूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे माजी अध्यक्ष श्रीशैल उटगे, माजी चेअरमन गणपत बाजूळगे आदिसह मांजरा परिवारातील सर्व साखर कारखान्याचे पदाधिकारी विलास सहकारी साखर कारखान्याचे सर्व संचालक ऊस उत्पादक शेतकरी तोडणी, वाहतूक ठेकेदार, कारखाना खाते प्रमुख, सभासद, मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी बोलताना माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांनी विलास सहकारी साखर कारखान्याच्या २३ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेनिमित्त सर्व सभासदांना शुभेच्छा दिल्या. त्यांनी मांजरा परिवारातील साखर कारखान्यांच्या प्रगतीचा लेखाजोखा मांडला, तसेच शेतकऱ्यांच्या नुकसानीबद्दल राज्य सरकारवर तीव्र टीका केली.

मांजरा परिवाराची यशस्वी वाटचाल

माजी मंत्री, आमदार आमदार अमित देशमुख म्हणाले की, आदरणीय विलासराव देशमुख साहेबांनी सुरू केलेल्या मांजरा शेतकरी साखर कारखान्याची ४१ वी वार्षिक सर्वसाधारण सभा नुकतीच पार पडली. मांजरा परिवाराने मागील ४० वर्षांच्या प्रगतीचा लेखाजोखा घेऊन पुढील ४० वर्षांचे उद्दिष्ट निश्चित केले आहे. मातृसंस्था असलेल्या मांजरा कारखान्याच्या नेतृत्वाखालील इतर सर्व साखर कारखान्यांची वाटचाल उल्लेखनीय असून, यात ऊस उत्पादक शेतकरी सभासद, अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे मोठे योगदान असल्याचे त्यांनी सांगीतले.

प्रामाणिक कारभारावर विश्वास

सहकारात प्रामाणिक कारभाराची आदरणीय विलासराव देशमुख साहेबांनी दिलेली शिकवण घेऊन आज आपला मांजरा परिवार काम करत आहे. आपल्यावर असलेल्या विश्वासाच्या बळावरच आजवर अनेक निवडणुका बिनविरोध झाल्या आहेत, असे त्यांनी नम्रपणे सांगितले. दोन दशकांत सर्वांगीण विकास झाल्याचे सांगतांना ते पुढे म्हणाले, दोन दशकात आपण सर्वांनी मिळून आपल्या संस्थेचा सर्वांगीण विकास केला. आज आपण इथेनॉल, कंप्रेस्ड गॅस तयार करतो आणि वाहनांसाठी सीबीडी गॅस येणाऱ्या काळात तयार करणार आहोत. ऊसातून केवळ साखर उत्पादन न ठेवता, अन्य उत्पादन घेत असल्याने ऊसाला चांगला भाव देता येईल असे माजी मंत्री, आमदार आमदार अमित देशमुख म्हणाले

शेतकऱ्यांच्या नुकसानीवर सरकारला फटकारले

यावेळी महाराष्ट्र गीत ऐकले जात असताना राज्यातील शेतकऱ्यांच्या वेदना पाहून अतीव दुःख होत असल्याचे आमदार देशमुख यांनी व्यक्त केले. ते म्हणाले, एकट्या लातूर जिल्ह्यातील नुकसानीचा आकडा ३ ते ४ हजार कोटी रुपयांपर्यंत जाईल, तर राज्याचा आकडा ५० हजार कोटींच्या घरात जाण्याची शक्यता आहे. मात्र, विद्यमान सरकारच्या काळात भ्रष्टाचार बोकाळला आहे. सरकारी अधिकारी 'गबाळ मारण्याच्या' विचारात असल्यासारखे वाटत आहे आणि सरकार अतिवृष्टीच्या नुकसानीबाबत निधीबाबत सकारात्मक असे ठोस बोलायला तयार नाही. सध्या आपण गेंड्याच्या कातडीचे सरकार पाहत आहोत असे सांगीतले.

नोकरभरती आणि आगामी गाळपाचे नियोजन

उच्च शिक्षण घेऊनही आज रोजगार उपलब्ध नसताना, मांजरा परिवाराने वेगवेगळ्या पदांवर आणि हार्वेस्टरच्या माध्यमातून १८ महिन्यांत १० हजार तरुणांना नोकऱ्या देण्याचे काम केले आहे. १००% यांत्रिकीकरणासाठी मांजरा परिवाराने पुढाकार घेतला असला तरी, चांगले काम करणाऱ्या ऊस तोड कामगार व मुकादम टोळ्यांचा रोजगार जाणार नाही, अशी ग्वाही त्यांनी दिली. मागील ४० वर्षांत मांजरा परिवाराने जी प्रगती साधली, त्यापेक्षाही अधिक प्रगती, अधिक विकास आणि ऊस उत्पादक शेतकऱ्यांची अशीच आर्थिक क्रांती आपल्याला येणाऱ्या ४० वर्षांत करायची आहे, असे सांगून आमदार देशमुख यांनी कारखान्याच्या संचालक व अधिकाऱ्यांना आगामी गाळप हंगामापूर्वी दसरा ते दिवाळीदरम्यान शेतकऱ्यांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी आणि रस्ते पाहणी करण्याच्या सूचना दिल्या. तसेच, झोमॅटो प्रमाणे ऊस तोडणीसाठीसुद्धा तंत्रज्ञानाचा वापर करावा, जेणेकरून शेतकऱ्यांना त्यांच्या शेतातील ऊस तोडणीचे वेळोवेळी अपडेट मिळतील. सध्या आसमानी संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना संपूर्ण नुकसान भरपाई मिळेपर्यंत शांत बसणार नाही, वेळप्रसंगी आंदोलन देखील करू, असा शब्द आमदार अमित देशमुख यांनी यावेळी शेतकऱ्यांना दिला. खासदार डॉ. शिवाजी काळगे म्हणाले की, अतिवृष्टीने शेतकऱ्यांचे खूप मोठे नुकसान झाले आहे. शक्तीपीठ महामार्गासाठी सरकारकडे हजारो कोटी रुपये आहेत, मात्र शेतकऱ्यांना मदत द्यायला सरकारकडे पैसे नाहीत. पंतप्रधान नरेंद्र मोदींकडे महाराष्ट्रासाठी विशेष मदत पॅकेजची मी मागणी केली आहे. शेतकऱ्यांच्या बांधावर पंचनामा करायला अधिकारी जात नाहीत, ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी खरडून गेल्या आहेत त्यांना रोजगार हमी योजनेतून काम करून त्यांच्या जमिनी पेरणी योग्य करून द्याव्यात, लोकनेते विलासराव देशमुख यांच्या नियोजनातून १३४ किलोमीटरचे बॅरेज आपल्या लातूर जिल्ह्यात उभे राहिले आहेत, परंतु सध्या सरकार व अधिकारी गेट दुरुस्ती वेळेवर त्याची करत नाहीत त्यामुळे त्याच्या बॅक वॉटर मुळे शेतकऱ्यांच्या शेती पिकाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे हे नुकसान टाळण्यासाठी यंत्रणा सजग असावी असे सांगीतले. विलास सहकारी साखर कारखान्याचे व्हा. चेअरमन माजी आमदार वैजनाथ शिंदे म्हणाले की, विलास सहकारी साखर कारखान्याने आतापर्यंत सर्वोत्कृष्ट काम करून ३७ बक्षीस मिळवले आहेत. लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने आमच्या कारखान्याला कर्ज देण्यासाठी नेहमी मदत केली आहे, असे सांगून संचालक मंडळाचा कार्य अहवाल व विलास कारखाना व युनिट दोनच्या गाळपाची सविस्तर माहिती उपस्थितांना त्यांनी दिली. लातूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष अभय साळुंके म्हणाले की, अतिवृष्टीच्या एवढ्या मोठ्या संकटात शेतकऱ्यांसमोर जीवन जगण्याचा गंभीर प्रश्न आहे. माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली काँग्रेस पक्षाने सर्कलनिहाय निरीक्षक अतिवृष्टीग्रस्त भागाची पाहणी व मदत करण्यासाठी नेमले आहेत, अतिवृष्टीने नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना साडे आठ हजार रुपये देण्याची राज्य सरकारची मदत तुटपुंजी आहे, त्यांना हेक्टरी ५० हजार रुपये पंजाब सरकारने मदत केली तशी करावी असे त्यांनी सांगितले.





लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे कार्यकारी संचालक हनमंतराव जाधव, गोविंद बोराडे, संभाजी रेड्डी, लातूर तालुका काँग्रेसचे अध्यक्ष सुभाष घोडके, अशोक गोविंदपूरकर, समद पटेल, अनिल पाटील, संचालक सर्वश्री संचालक सर्वश्री रवींद्र काळे, अमृत जाधव, सतीष शिंदे (पाटील), अनंत बारबोले, नरसिंग बुलबुले, नितीन पाटील, गोवर्धन मोरे, रंजीत पाटील, रसूल पटेल, तात्यासाहेब पालकर, हनमंत पवार, नेताजी साळुंके (देशमुख), रामराव साळुंके, दिपक बनसोडे, लताबाई देशमुख, शाम बरुरे, सुभाष माने, युनिट एक चे कार्यकारी संचालक आबासाहेब पाटील,युनिट दोन चे कार्यकारी संचालक आत्माराम पवार आदी उपस्थित होते. विलास सहकारी साखर कारखाना अधिमंडळाच्या २३ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सुरुवात महाराष्ट्र गीताने झाली, या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राहुल इंगळे पाटील यांनी केले तर शेवटी आभार विलास सहकारी साखर कारखान्याचे युनिट दोनचे कार्यकारी संचालक ए.आर. पवार यांनी मानले प्रारंभी दिपप्रज्वलन करुन मानयवरांनी आदरणीय विलासराव देशमुख यांच्या प्रतिमेला पुष्पअर्पन करुन अभिवादन केले.

# तहसीलदारांचे आवाहन अन व्यापारी महासंघाचा प्रतिसाद

## हातावर पोट असणाऱ्या मजुरांसाठी दिला पंचावन्न हजार रुपयांचा मदतनिधी

केज/प्रतिनिधी अतिवृष्टी झाली अन हातावर पोट असणाऱ्या स्थलांतरित मजुरांचे हाल सुरु झाले हाताला काम नाही मग पॉट भरणार कस अशावेळी नशिबी फक्त उपासमार सुरु झाली त्यांची हि अवस्था तहसीलदारांच्या कानी आली अन त्यांनी केलेल्या मदतीच्या आवाहनाला केज व्यापारी महासंघाने तात्काळ प्रतिसाद देत अवघ्या अर्धा तासात पंचावन्न हजारांची मदत तातडीने तहसीलदार राकेश गिड्डे यांच्याकडे सुपूर्द केली. तालुक्यात मागच्या पंधरा दिवसापासून होत असलेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे नुकसान झालेच आहे पिके पाण्यात गेली अन होत्याच न्हवत झाल मात्र या अतिवृष्टीचे आणखीनही बरेच साईड इफेक्ट असून ते आता दिवसेंदिवस समोर येऊ लागले आहेत. सोयाबीन काढणीचे दिवस असल्याने तालुक्यात सोयाबीन काढणीसाठी स्थलांतरित मजुरांच्या अनेक टोळ्या मागच्या काही दिवसापूर्वी दाखल झाल्या पण सततच्या पावसामुळे काम तर सोडा त्यांच्या राहण्याचेही वांदे सुरु झाले आतापर्यंत सोबत असलेले धान्य खाऊन पोटाची खळगी भरली पण पुढे कामच नाही मग पोट भरायच कस ? हा प्रश्न मागच्या तीन चार दिवसांपासून सुरु झाला पण इथ आपल कुणी नाही मग अडचण सांगायची कुणाला हाही प्रश्न होताच त्यांची हि अडचण केजचे कर्तव्यदक्ष तहसीलदार राकेश गिड्डे यांच्याकडे काहींनी सांगितली परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेत तहसीलदारांनी केज तालुका व्यापारी महासंघाला सदरील बाब सांगितली व काही मदत करता येईल का असा प्रश्न केला. व्यापारी महासंघाच्या व्हाट्स अप ग्रुपवर मदतीची पोस्ट केली अन बघता बघता अर्धा तासातच पंचावन्न हजार दोनशे रुपयांची रक्कम जमली. जमलेली रक्कम घेऊन व्यापारी बांधव यांनी तहसील कार्यालयात जात तहसीलदार गिड्डे यांची भेट घेऊन त्यांच्याकडे जमा झालेली रक्कम सुपूर्द केली त्यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत व्यापारी बांधवानी निधी जमवून दिल्याबद्दल त्यांनी आभार व्यक्त केले.




# केज तालुक्यात पुन्हा आभाळ फाटल रात्रदिवस अति मुसळधार पाऊस सोयाबीनसह इतर पिकांचे नुकसान तर पाझर तलाव फुटण्याची भीती

केज/प्रतिनिधी बीड जिल्ह्यासह केज तालुक्यामध्ये मागील पंधरा ते वीस दिवसापासून सतत मुसळधार पाऊस चालू आहे. त्यामुळे केज तालुक्यात शेकडो एकर सोयाबीन पिकाचे शंभर टक्के नुकसान झाले आहे.मांजरा नदीचे पाणी अनेक गावांमध्ये शिरले आहे.मांजरा धरण ओव्हर फ्लो झाले आहे. सर्व दरवाजे उघडले असून तरी सुद्धा पाणी कळंब शहरासह केज तालुक्यातील मांजरा नदीकाठच्या गावामध्ये घुसले आहे.नदी काठच्या गावात पाणी शिरले असूनसोयाबीन,तूर, कापुस,ऊस पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. सोयाबीन पिक हे शंभर टक्के गेले असून शेतकरी आता मोठ्या संकटात सापडला आहे,दिवाळी कशी साजरी करणार असा प्रश्न पडला आहे.मागच्या दोन तिन दिवसा अगोदरच अतिमुसळधार पाऊस झाला होता त्यात पुन्हा आभाळ फाटल एवढा मोठ्याप्रमाणात पाऊस कधीच झाला नाही घरात पाणी शिरल शेतात कापणीला आलेले पीक पाण्यात सडत आहे जनावरे दगावली सर्व बाजूंनी शेतकरी संकटात सापडला आहे. अजून सुद्धा सरकारी मदत पोहचली नाही पंचनामे करून सुद्धा सरसकट कर्ज माफी, पन्नास हजार रुपये प्रति हेक्टरी अनूदान दयावे व ओला दुष्काळ जाहीर करावा अशी मागणी सर्व शेतकऱ्यांतुन केली आहे.



# बीड जिल्ह्यातील अतिवृष्टी झालेल्या नुकसानग्रस्त भागाचा पाहणी दौरा

बीड/प्रतिनिधी बीड जिल्ह्यातील बीड तालुका येथील पाली व कुर्ला, गेवराई तालुक्यातील हिरापूर व इटकूर ,शिरूर कासार तालुक्यातील निमगाव नांदेवली,ब्राह्मनाथ येळंब घाट व सवसवाडी आदी पूरग्रस्त भागाची पाहणी करून या गावांमध्ये अतिवृष्टी व पुरामुळे अनेकांच्या संसाराची राख रांगोळी झाली भिजून वाहून गेलेल्या घरांना भेटी दिल्या. व्यथा मांडताना घर उध्वस्त झालेल्या कुटुंबाचे अश्रू अनावर झाले होते. गावातील शेतकरी बांधवांचे सर्वस्व या पावसाने हिरावून घेतले आहे. उभ आयुष्य कष्ट करून शेतीतुन चार पैसे हाती येतील म्हणूल शेतकरी राबला मात्र हाताशी आलेला घास निसर्गाने हिरावून नेला सोयाबीन, कापूस व खरीप पिके पाण्याखाली गेल्याने शेतकऱ्यांचे कष्ट डोळ्यासमोर वाहून गेलेले पाहून मन हेलावून गेले. जनावरांसाठीचा चारा, शेतातील बियाणे, साठवलेले अन्नधान्य – सगळ काही वाहून गेल आहे. डोळ्यादेखत जनावरे वाहून जाताना बघून वेदना सांगताना शेतकऱ्यांचा बांध फुटला होता. शेतकरी शेतमजूर, व्यापारी बांधवांचेही मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. दुकानात पाणी घुसल्याने संसाराचा गाडा उभा करणाऱ्या अनेक कुटुंबांवर मोठे संकट आले आहे. इथल आभाळच फाटलय पण अस्मानी संकटे पेलताना सरकारने तात्काळ भरीव मदत करावी अशा सूचना जिल्हाधिकारी, तहसीलदार,तलाठी, ग्रामसेवक, कृषी सहाय्यक, मंडळ अधिकारी, यांच्याशी संवाद साधून घरांची पडझड, शेतीतील नुकसान व व्यापारी बांधवांचे नुकसान याबाबत तात्काळ मदत देण्याच्या सूचना दिल्या. या पाहणी दौऱ्यात काँग्रेसचे ज्येष्ठ नेते माजी मंत्री अशोकराव पाटील साहेब, खा. डॉ. शिवाजीराव काळगे , प्रदेश सरचिटणीस दादासाहेब मुंडे,गणेश राऊत,जिल्हाध्यक्ष राहुल भैय्या सोनवणे, जिल्हाउपाध्यक्ष प्रविणकुमार शेप,नवनाथ थोटे,युवक काँग्रेस जिल्हाध्यक्ष श्रीनिवास बेदरे,बीड तालुकाध्यक्ष गणेश बजगुडे, गेवराई तालुकाध्यक्ष महेश बेदरे, शिरूर तालुकाध्यक्ष भास्कर केदार, बीड शहराध्यक्ष परवेज खुरेशी, राजाराम पवार,प्रताप मोरे, प्रवीण सोट,गणेश जवकर , महिला तालुकाध्यक्ष विविध गावातील ,सरपंच ,उपसरपंच ग्रामपंचायत सदस्य काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते, शेतकरी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# संत गोपाळबुवा महाराज साखर कारखान्याचा दसऱ्या दिवशी गळीत हंगामाचा शुभारंभ

## ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी उपस्थित रहावे राजेश कराड यांचे आवाहन

लातूर : – लातूर तालुक्यातील मौजे रामेश्वर कासार जवळा परिसरात येथे उभारण्यात आलेल्या श्री संत गोपाळबुवा महाराज या साखर कारखान्याचा पहिला चाचणी गळीत हंगामाचा शुभारंभ २ ऑक्टोबर २०२५ विजयादशमी गुरुवार रोजी लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांच्यासह अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत होणार असून या स्वप्नपूर्ती कार्यक्रमास ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन कारखान्याचे चेअरमन राजेश कराड यांनी केले आहे.

ऊस उत्पादक शेतकऱ्यांना न्याय मिळावा आणि त्यांच्या हिताची जपणूक व्हावी यासाठी लातूर तालुक्यातील मौजे रामेश्वर कासार जवळा परिसरात उभारण्यात आलेल्या श्री संत गोपाळ बुवा महाराज शुगर अँड अ‍ॅग्रो इंडस्ट्रीज या साखर कारखान्याचा पहिला चाचणी गणित हंगाम विजयादशमीच्या दिवशी पंढरपूर येथील श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर देवस्थानचे अध्यक्ष ह.भ.प. गहिनीनाथ महाराज औसेकर, प.पु. विद्यानंद सागर महाराज गातेगावकर, हभप नारायण महाराज उत्तरेश्वर पिंपरीकर, हभप बाबा महाराज बोराडे काटगावकर आणि जिल्हा बँकेचे नाथसिंह मालक देशमुख गातेगावकर यांच्या शुभहस्ते होणार असून याप्रसंगी लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड, शिवसेनेचे जिल्हा संपर्कप्रमुख अ‍ॅड. बळवंतराव जाधव, अंबाजोगाई साखर कारखान्याचे व्हॉईस चेअरमन दत्तात्रय आबा पाटील यांची प्रमुख उपस्थित राहणार आहेत.

सदरील गळीत हंगामाचा शुभारंभ विजया दशमी २ ऑक्टोबर २०२५ गुरुवार रोजी सकाळी ११ वाजता आयोजित करण्यात आला असून शेतकऱ्यांच्या या स्वप्नपूर्ती सोहळ्यास कारखाना कार्यक्षेत्रातील ऊस उत्पादक शेतकरी, कारखान्याचे भागधारक आणि हितचिंतकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आव्हान कारखान्याचे मुख्य प्रवर्तक तुळशीरामअण्णा कराड आणि कारखान्याचे चेअरमन राजेश मालक कराड यांनी केले आहे.



# तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धेमध्ये जीवन शिक्षण विद्यालयाच्या विद्यार्थिनींनी मारली बाजी

केज/प्रतिनिधी तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धेमध्ये जीवन शिक्षण विद्यालयाच्या विद्यार्थिनीनी घवघवीत यश संपादन करीत प्रथम क्रमांक पटकावला आहे. याबाबतची सविस्तर माहिती अशी की, भाऊसाहेब पाटील अध्यापक विद्यालय, केज येथे नुकत्याच पार पडलेल्या तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धेमध्ये केज येथील जीवन शिक्षण प्राथमिक विद्यालयाच्या विद्यार्थिनींनी अतुलनीय जिद्द, शिस्त व सामन्यावरील पकड दाखवत तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांकाचे विजेतेपद पटकावले आहे. या उल्लेखनीय यशामागे क्रीडा मार्गदर्शक श्री भीमशंकर तोंडसे सर, साजेद पठाण सर, अश्विनी दळवे मॅडम, किशोर मस्के सर यांचे मोलाचे मार्गदर्शन ठरले. तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धेतील जीवन शिक्षण प्राथमिक विद्यालयातील विद्यार्थिनीची जिल्हास्तरीय स्पर्धे साठी निवड झालेली आहे. या यशाबद्दल व आगामी जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी संस्थेचे सचिव हारुणभाई इनामदार, सहसचिव यासीनभाई इनामदार, मुख्याध्यापक रमाकांत ढाकणे सर, प्राचार्य दत्तात्रय हांडीबाग सर, बंसल क्लासेसचे सहसंचालक गोविंद ठोंबरे सर, मुख्याध्यापक बाळासाहेब ठोंबरे सर व शिक्षक वृंद यांनी सर्व खेळाडूंचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.




# उत्तरप्रदेश सारनाथ येथील बौद्ध धम्म परिषदेत उत्तमराव तरकसे यांचा सन्मान

नवी मुंबई :– उत्तरप्रदेशातील सारनाथ येथे अश्वघोष सांस्कृतिक मंच च्या वतीने २ री बौद्ध धम्म परिषद उत्तरप्रदेश मधील सारनाथ येथील भारत सरकारचे भारतीय पुरातत्व सर्वेक्षण सारनाथ मंडल कार्यालयाच्या प्रांगणात आयोजन करण्यात आले होते, सदर धम्म परिषदे करिता निमंत्रित विशेष अतिथी म्हणून समाजभूषण मा. श्री. उत्तमराव तरकसे (महाराष्ट्र राज्य शासनाचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्काराने सन्मानित ज्येष्ठ कवी साहित्यिक व विचारवंत) हे उपस्थित होते सदर धम्म परिषदेस थायलंड देश्यामधील मा.श्री चंद्रमणी ज्योतिषा (भंतेजी), या परिषदेचे अध्यक्ष व प्रमुख पाव्हणे म्हणून भूतान देशातील मा.श्री सत्यजित (भंतेजी), तसेच इतर मान्यवर सुद्धा उपस्थित होते.

सदर धम्म परिषदेच्या विचार मंचावरून मा. उत्तमराव तरकसे हे आपले विचार मांडताना म्हणाले की, सध्या स्वतःला हिंदू धर्म पंडित मानणारे 'तथागत भगवान गौतम बुद्धांला विष्णूचा अवतार मानतात व तसा ते धर्मवेढ्या जनतेत प्रसार सुद्धा करतात मग यांनी विष्णू सोबत आपल्या देवघरात तथागत भगवान गौतम बुद्धांना सुद्धा ठेवावे व रोज त्याची पूजाअर्चा करावी पण तसे होत नाही आणि होणार सुद्धा नाही..! झिजल्याले खांदे हे बोलणाऱ्या ओठापेक्षा श्रेष्ठ असतात..! असा अख्खा देह तथागत भगवान गौतम बुद्धाने ज्ञानप्राप्तीसाठी झिजवलेला आहे असे प्रखर विचार मांडत समाज प्रबोधन धम्म प्रवचन सुद्धा केले तसेच सदर परिषदेमध्ये उपस्थित राहून बाहेरच्या देशातून आलेल्या भंतेजींना वैयक्तिक भेटून धम्मा विषयीचे मार्गदर्शन सुद्धा घेतले व सारनाथ मधील सर्व बौद्ध विहाराची पाहणी करत तथागत भगवान गौतम बुद्धांना ज्ञानप्राप्ती नंतर प्रथम त्यांनी सारनाथ येथे पाच शिष्यांना प्रवचन दिलेल्या शिल्पाकृती प्रतिमेस व बोधिवृक्षास नतमस्तक होऊन वंदन केले.




# ग्रामसभा न घेतच ग्रामविकास अधिकाऱ्यांच्या सांगण्यावरून सेवकाने घेतल्या ग्रामस्थांच्या सह्या-अमर गायकवाड

केज/प्रतिनिधी केज तालुक्यातील सुकळी येथे ग्रामसभा न घेताच ग्रामविकास अधिकारी यांच्या सांगण्यावरून ग्रामपंचायतचे सेवक (शिपाई) यांनी ग्रामस्थांच्या खोट्या स्वाक्षऱ्या घेतल्या आहेत.या प्रकरणी कायदेशीर कारवाई करण्यात यावी अशी मागणी लेखी निवेदनाद्वारे गट विकास अधिकारी यांच्याकडे अमर गायकवाड यांनी केली आहे. याबाबतची सविस्तर माहिती अशी की, दिनांक २५ सप्टेंबर २०२५ रोजी सुकळी ग्रामपंचायत कार्यालयाचा सेवक (शिपाई) वाघमारे हे ग्रामविकास अधिकारी राऊत यांच्या सांगण्यावरून ग्रामपंचायत कार्यालयाचे रजिस्टर घेऊन ग्रामविकास अधिकारी हजर नसताना सुकळी गावामध्ये ग्रामस्थांना बोलावून त्यांच्या सह्या घेत होता. अमर गायकवाड यांनी शिपाई वाघमारे यांना विचारणा केली असता दिनांक १५ ऑगस्ट रोजी झालेल्या सभेच्या सह्या आहेत. तसेच गावामध्ये घरकुल योजना राबविण्यात आली आहे व अजून ग्रामस्थांना घरकुल देण्यासाठी या सह्या ग्रामसेवक यांच्या सांगण्यावरून घेत आहे असे उत्तर दिले. परंतु या रजिस्टरच्या पहिल्या पानावरती कोणत्याच प्रकारचा मजकूर अथवा ठराव लिहिण्यात आला नव्हता ते पान पूर्णपणे कोरे होते. याच प्रकारे सुकळी गावामध्ये ग्रामसेवक, सुकळी ग्रामपंचायत कार्यालयाचा शिपाई यांचे कडून दरवेळेस जे लोक योजनेसाठी म्हणजेच घरकुला साठी, विहिरीसाठी टक्केवारीने पैसे देतात त्यांनाच योजना मिळते. तसेच सुकळी ग्रामपंचायत यांना लुटण्याचे काम, ग्रामसेवक, शिपाई व काही ग्रामस्थ मिळून करत आहेत. गावामध्ये राबविण्यात आलेल्या घरकुल योजनेमध्ये सर्वच भ्रष्टाचार झालेला आहे. ज्या ग्रामस्थांचे आधीच सिमेंटचे, स्लॅब चे घर आहे त्यांनाच घरकुल दिलेले आहे सदर शिपाई यांनी सह्या घेतलेल्या आहेत त्यामध्ये विशाल बापूराव गायकवाड यांची सही करण्यात आलेली आहे. विशाल गायकवाड हे मागील दिनांक २२ सप्टेंबर पासून गावामध्ये नाहीत. विशाल गायकवाड हे माजलगाव ला गेलेले असताना देखील त्यांची सही करण्यात आलेली आहे. घरकुल मध्ये जुनेच घर दाखवून सगळ्यांनीच घरकुल योजना उचलून ग्रामसेवकांसोबत शासनाची फसवणूक करत पैसे उचललेले आहेत. एक आणि तर आधीच त्यांच्या आजीच्या नावावर घरकुल मिळालेले असताना ते न बांधताच त्या जागेवर ग्रामसेवकाला टक्केवारी देऊन पुन्हा घरकुल योजना घेतली आहे. काही ग्रामस्थांनी तर एकही वीट न ठेवता जुन्या घरावरती दोन हप्ते उचललेले आहेत. मागेल त्याला घरकुल योजना असे शासनाचे धोरण असताना टक्केवारी देईल त्यालाच घरकुल, विहीर योजना असे ग्रामपंचायत सुकळी मध्ये राबविण्यात येत आहे. शिपाई वाघमारे हे नेहमीच अशा प्रकारे ग्रामसेवक यांच्या सांगण्यावरून खोट्या सह्यांचे सत्र सुकळी गावामध्ये राबवीत आहेत. शिपाई वाघमारे हे गाव मध्ये सह्या घेत असतानाचा व्हिडिओ रेकॉर्डिंग पुरावे आहेत. सुकळी ग्रामपंचायत कार्यालयाचे ग्रामसेवक एस.एम. राऊत, ग्रामपंचायत कार्यालयाचे शिपाई वाघमारे व खोट्या सह्या करणारे ग्रामस्थ यांच्या वरती ग्रामपंचायत ची कोणती सभा नसताना रजिस्टर चे पहिले पान कोरे सोडून ग्रामस्थांच्या सह्या घेतल्याप्रकरणी कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी तसेच घरकुल योजनेची चौकशी करून दोषी वरती शासनाचे पैसे परत घेत कायदेशीर कारवाई करण्यात यावी या मागणीचे लेखी निवेदन अमर गायकवाड यांनी गट विकास अधिकारी पंचायत समिती केज यांना दिले आहे.



PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE